सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २६ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तरुणांना सूचना देण्याऐवजी संवाद साधणे आवश्यक

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत; कुटुंबव्यवस्था बळकट करण्याचे आवाहन

**मुंबई :** आजच्या नवीन पिढीच्या जडणघडणीसाठी पालकांनी सूचना किंवा उपदेश देण्याऐवजी मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शनिवारी केले. भौतिक गोष्टींचा प्रभाव असणाऱ्या आणि माहितीच्या चक्रव्यूहात वाढणाऱ्या आजच्या तरुणांना कठोर पवित्र्यापेक्षा प्रेमाने व विश्वासाने गोष्टी समजावून सांगण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच घरात मोबाईलच्या अतिवापरामुळे कमी होत चाललेल्या संवादाबद्दल चिंता व्यक्त करताना, पालकांनी स्वतः आदर्श आचरणाचा वस्तुपाठ मुलांसमोर ठेवावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

विश्वमांगल्य सभेच्या वतीने आयोजित 'युगानुकूल मातृत्व' या विषयावरील प्रबोधन बैठकीच्या समारोप सत्रात डॉ. भागवत बोलत होते. या कार्यक्रमाला



विविध क्षेत्रांतील ९०० हून अधिक प्रबुद्ध महिला उपस्थित होत्या. सरसंघचालक म्हणाले की, पूर्वीच्या काळात अनुभवाच्या आदरावर मोठ्यांचे बोलणे लगेच स्वीकारले जात असे. मात्र आज परिस्थिती वेगळी आहे. मुले सातत्याने प्रश्न विचारतात. "देवतांचा चेहरा हत्ती किंवा माकडासारखा का आहे?" अशा प्रश्नांची उत्तरे अनेकदा पालकांकडे नसतात. मुलांच्या जिज्ञासांचे निरसन करण्यासाठी पालकांनी स्वतःचे ज्ञान वाढवणे आवश्यक आहे. तसेच मुलांच्या पहिल्या १२ वर्षांतील जडणघडणीत योग्य संस्कार व्हावेत, यासाठी सुरुवातीपासूनच पाठ्यपुस्तकांमध्ये आपल्या देवतांविषयीची शास्त्रीय व योग्य माहिती समाविष्ट केली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भारतीय ज्ञानपरंपरेवर विश्वास हवा

भारतीय संस्कृती आणि इतिहासाबद्दल अनेकदा जाणीवपूर्वक गैरसमज आणि भ्रम पसरवला जातो, असे सांगून डॉ. भागवत म्हणाले की, आपली ज्ञानपरंपरा प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आणि अत्यंत मजबूत पायावर उभी आहे. पाश्चात्त्य जीवनशैलीचे अंधानुकरण करण्याऐवजी भारतीय दृष्टिकोनावर आधारित कुटुंबव्यवस्था व समाजव्यवस्था अधिक सुदृढ करण्याची आज गरज आहे. विविधतेत एकात्मता हेच भारतीय संस्कृतीचे मूळ तत्त्व असून, इतिहास आणि जीवनमूल्यांवर श्रद्धा ठेवून समाजाने पुढे गेले पाहिजे.

## थोडक्यात

### SRPF जवानाने स्वतःवर गोळ्या झाडून केली आत्महत्या



**पंढरपूर :** आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल - रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये लाखो भाविकांची गर्दी आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक पंढरपूरमध्ये आले आहेत. संपूर्ण पंढरपूरमध्ये चोख बंदोबस्त आहे. सुरक्षेसाठी राज्य राखीव पोलिस दलाचे जवान पण मोठ्या संख्येने तैनात आहेत. या अशा वातावरणात भाविकांच्या सुरक्षेसाठी बंदोबस्तावर असलेल्या राज्य राखीव पोलिस दलाच्या जवानाने स्वतःकडे असलेल्या शस्त्रातून स्वतःवरच गोळी झाडून घेत आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना आषाढी एकादशीच्या दिवशीच पहाटे घडली. आत्महत्या करणाऱ्या राज्य राखीव पोलिस दलाच्या जवानाचे नाव रामेश्वर ध्रुपद साबणे असे आहे. आषाढी वारीतील गर्दी आणि सुरक्षा लक्षात घेता SRPF ची तुकडी पंढरपुरात तैनात करण्यात आली होती. या तुकडीतील रामेश्वर ध्रुपद साबणे या जवानाने आत्महत्या केली. पहाटे अडीचच्या सुमारास मंदिरात विठ्ठलाची शासकीय महापूजा सुरू होती. ही पूजा सुरू असतानाच रामेश्वर ध्रुपद साबणेने आत्महत्या केली. गोळीचा आवाज ऐकून सहकारी जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली, मात्र गंभीर दुखापतीमुळे रामेश्वर ध्रुपद साबणेचा जागीच मृत्यू झाला.

# मी राज्यात समाधानी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## दिल्लीत जाण्याच्या चर्चांवर भाष्य; संत तुकारामांच्या अभंगाचा संदर्भ देत या चर्चांना पूर्णविराम

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय मंत्रिमंडळात मोठी जबाबदारी मिळेल, असे दावे विरोधकांकडून सातत्याने केले जात आहेत. त्यावर भाष्य करताना, मी महाराष्ट्रात समाधानी आहे, असे फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा संपन्न झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले.

दिल्लीत जाण्याच्या सर्व चर्चा फेटाळून लावताना मुख्यमंत्र्यांनी 'तुका म्हणे उगे रहावे, जे जे होईल ते पहावे, चित्त असू द्यावे समाधानी' या ओळींचा संदर्भ दिला. "माझे चित्त पूर्णपणे समाधानी आहे. पांडुरंगाच्या आशीर्वादाने मला सहा वेळा आषाढी आणि दोन वेळा कार्तिकी एकादशीला पूजा करण्याचे भाग्य लाभले. राज्याच्या जनतेचा प्रतिनिधी म्हणून ही संधी मिळणे हा विठूरायाचाच प्रसाद आहे," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या स्थितीवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, कर्जमाफी किंवा हमीभाव पुरेसा नसून उत्पादन खर्च कमी करणे हाच खरा उपाय आहे. शेतमालाचे दर हे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ठरवत असल्याने आणि उत्पादन खर्च सातत्याने वाढत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहे.

# आषाढी एकादशी लाखो भाविकांचे नाथदर्शन

तभा वृत्तसेवा

**पैठण दि २५ :-** आषाढी एकादशीच्या पर्वावर वारकरी भक्तांची मांदियाळी असलेल्या श्रीक्षेत्र पैठणच्या शांतीब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज यांच्या समाधीचे दर्शन लाखो भाविकांनी घेतले. आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी सपत्नीक नाथांचे दर्शन घेऊन राज्यासाठी मंगल कामना केली. यावेळी तहसीलदार ज्योती पवार, उप जिल्हा प्रमुख विनोद पा. बोंबले,नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसणकर, भूषण कावसणकर, मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, जिल्हा दूध संघाचे नंदलाल काळे, नाथसंस्थांनचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



पहाटेपासूनच दोन्ही नाथमंदिर तसेच गोदावरी मोक्ष घाटावर स्नानासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसली. काकड आरती, अभिषेक आणि अन्य धार्मिक विधी मंदिरात पार पडले.भाविकांना दर्शन सुलभ व्हावे म्हणून संस्थानच्या वतीने विशेष काळजी घेण्यात आली.पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी वाहतूक विषयी चांगली व्यवस्था ठेवल्याने शहरात अनावश्यक प्रकार घडला नाही. त्यापाठोपाठ स्वयंसेवी भक्तांकडून तसेच नाथसंस्थांनच्या वतीने भाविकांना मोठया प्रमाणात फराळ वाटप करण्यात आले. पैठणला पाण्यात बुडून मृत्यूची घटना पाहता स्नानादरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून नाथसागर तसेच गोदावरी पात्र परिसरात पैठण पोलीस, नगरपरिषद अग्निशमन दल,धरण सुरक्षा रक्षक एजन्सीने चांगली मेहनत घेतली.

# देवगिरी बँकेच्या पर्यावरण वारीत कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी पावली खेळत अनुभवला भक्तिरस

## आषाढी एकादशीनिमित्त बँकेचे अधिकारी, संचालक व कर्मचारी झाले सहभागी

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरण वारीला यंदा विशेष उत्साह लाभला. बँकेचे कर्मचारी, अधिकारी, संचालक आणि पदाधिकारी यांनी एकसमान गणवेश परिधान करून भक्तिमय वातावरणात वारीत सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



या वारीचे प्रमुख आकर्षण म्हणजे महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांचा सहभाग. त्यांनी देवगिरी बँकेच्या कर्मचाऱ्यांसमवेत वारीत सहभागी होत पारंपरिक पावली खेळली. कर्मचाऱ्यांसोबत उत्साहाने पावले टाकत त्यांनी वारीचा आनंद लुटला. त्यांच्या सहभागामुळे वारीतील भक्तिमय वातावरण अधिकच रंगले आणि उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

वारीमध्ये देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, संचालिका प्रज्ञा तल्लार, संचालिका अमितताई लेकुरवाळे, संचालक सुरेश जगाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भक्ती, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देणाऱ्या या पर्यावरण वारीत वारकरी परंपरेचा उत्साह अनुभवायला मिळाला. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे देवगिरी बँकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये भक्तीभाव, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाबाबत जागरूकतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

# आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल-रुक्मिणी महाआरती

## भाजप राजस्थान व महिला प्रकोष्ठातर्फे खिचडी प्रसादाचे वितरण

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठ यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान विठ्ठल-रुक्मिणी यांची महाआरती तसेच भाविकांसाठी खिचडी प्रसाद वितरणाचा धार्मिक व भक्तिमय कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून विठ्ठल-रुक्मिणींचे दर्शन घेत महाआरतीत सहभाग नोंदविला.



कार्यक्रमास माजी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, उद्योगपती विवेक देशपांडे, माजी जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर, मंडल अध्यक्ष सचिन गुगले, नगरसेवक किशोर मानकापे, उत्तर भारतीय आघाडीचे सुनील उपाध्याय यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी भगवान विठ्ठल-रुक्मिणींची विधिवत पूजा व महाआरती करून राज्याच्या सुख-समृद्धीची तसेच सर्वसामान्यांच्या कल्याणाची प्रार्थना केली.

यावेळी राजस्थान प्रकोष्ठाचे संजय मंत्री, अभिषेक फयाल, सोमनाथ तांबी, जगदीश जांगिड, नंदकिशोर मालपाणी तसेच महिला प्रकोष्ठाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात आणि प्रसाद वितरणात सक्रिय सहभाग घेतला. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना खिचडी प्रसादाचे वितरण करून सेवाभावाची परंपरा जपली.

महाआरतीनंतर आयोजित खिचडी प्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत धार्मिक सण सामाजिक ऐक्य, सेवा आणि संस्कृती जपण्याचे प्रभावी माध्यम असल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजस्थान प्रकोष्ठ, महिला प्रकोष्ठ आणि सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन करत भविष्यातही अशा सामाजिक व धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सेवा व संस्कारांची परंपरा अधिक बळकट करण्याचे आवाहन केले.

# सलग 20 वर्षे वारीचं फळ! धाराशिवच्या माने दाम्पत्याला विठुरायाच्या महापूजेचा मान

**पंढरपूर :** आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरातील दर्शन रांगेतील पहिल्या निष्ठावंत वारकरी दाम्पत्याला मानाच्या वारकऱ्याचा बहुमान देण्यात आला. यंदा हा सन्मान धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माधव माने आणि प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्याला मिळाला.

धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील बाबासाहेब आणि प्रभावती माने हे शेती व्यवसाय करतात. गेल्या सलग २० वर्षांपासून ते मनोभावे पंढरीची वारी करत आहेत. त्यांच्या कुटुंबातील ही वारीची तिसरी पिढी असून विठ्ठल भक्तीची परंपरा त्यांनी जपली आहे.

महापूजेचा मान मिळाल्यानंतर बोलताना माने दाम्पत्याने आनंद व्यक्त केला. "आम्ही २० वर्षांपासून वारी करत आहोत. आमच्या कुटुंबात वारी करणारी ही तिसरी पिढी आहे. मानाचे वारकरी होण्याचा सन्मान मिळेल, असे स्वप्नातही वाटले नव्हते. विठुरायाच्या महापूजेचा मान मिळाल्याने आयुष्य कृतार्थ झाले," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

बाबासाहेब आणि प्रभावती माने यांना एक मुलगा, चार मुली आणि आठ नातवंडे असा मोठा परिवार आहे. सलग दोन दशकांच्या अखंड वारीमुळे (Pilgrimage) त्यांना यंदा विठुरायाच्या महापूजेचा मान मिळाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) कडून त्यांना एक वर्षासाठी मोफत प्रवास पासही प्रदान करण्यात आला.

### तब्बल 1278 महिलांमध्ये स्तन कर्करोगाची लक्षणे

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसांचे औचित्य साधून मुंबईतील ३० वर्षांपेक्षा अधिक वयोमान असलेल्या महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी शिबिरांचे आयोजन २२ जुलै २०२६ रोजी मुंबईत २९८ ठिकाणी करण्यात आले. याशिबिरांत तब्बल २७ हजार ८६६ महिलांची स्तन कर्करोग तपासणी करण्यात आली आहे. त्यात तब्बल १२७९ महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग झाल्याचे तपासणीत दिसून आले असून सर्व महिलांवरील उपचार महापालिकेच्यावतीने मोफत केले जाणार आहे. यासाठी महापालिकेच्यावतीने महापौर वैद्यकीय निधी तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा वापर करून महिलांवरील याचे पुढील उपचार मोफत केले जातील असे महापालिका सार्वजनिक आरोग्य समिती अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांनी जाहीर केले.






# अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा (म.) येथील पारंपरिक वहीवाटीचा शेतरस्ता केला मोकळा; तहसीलदार विलास तरंगे यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील मौजे पाटोदा (म.) येथील शेतकऱ्यांच्या पिढ्यान पिढ्या वापरात असलेल्या पारंपरिक वहीवाटीच्या शेत रस्त्यावरील बेकायदेशीर अतिक्रमण आणि अडथळे दूर करून तो रस्ता पूर्ववत मोकळा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे यांनी दिला आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरात या निर्णयाचे स्वागत होत आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

मौजे पाटोदा (म.) येथील गट क्र.३७२, ३७३,३७४,३७५ व ३७६ मधील शेतकरी मागील अनेक वर्षां पासून आपल्या शेतात ये-जा करण्यासाठी लगतच्या गट क्र.२८८ मधील होळणा नदीच्या दक्षिण बाजूस असलेल्या पारंपरिक वहीवाटीच्या शेत रस्त्याचा बैलगाडी व शेतमाल वाहतुकीसाठी वापर करत होते.मात्र, काही महिन्यांपूर्वी गट क्र.२८८ चे शेतकरी मनिषा दिलीप वळसे व इतर यांनी या रस्त्यावर नारळाची रोपटी लावून तसेच लोखंडी तारांचे बेकायदेशीर कुंपण व गेट उभारून शेतकऱ्यांची वहीवाट पूर्णपणे बंद केली होती.त्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीकाम, मशागत व शेतमालाची वाहतूक मोठ्या प्रमाणात अडचणीत आली होती.

न्यायालयीन लढा

या अन्यायाविरुद्ध अर्जदारॲड.श्रीनिवास कुलकर्णी,ॲड.सचिन कुलकर्णी,रत्नाकर भागोराम पन्हाळे व इतर शेतकऱ्यांनी अंबाजोगाई तहसीलदार न्यायालयात मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये रस्त्यावरील अडथळे दूर करून रस्ता खुला करण्या साठी अर्ज दाखल केला. दि.२० एप्रिल २०२६ रोजी प्रकरण दाखल करण्यात आले. प्रकरणात मंडळ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा केला. त्यामध्ये रस्त्यावर बेकायदेशीर तारांचे कुंपण व लोखंडी गेट उभारल्याचे स्पष्ट झाले.

तहसीलदारांचा आदेश

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद मंडळ अधिकाऱ्यांचा अहवाल आणि साक्षीदारांची शपथपत्रे विचारात घेऊन तहसीलदार विलास तरंगे साहेब यांनी अर्जदारांचा अर्ज मंजूर केला.दि.१ जुलै २०२६ रोजी दिलेल्या आदेशात गट क्र.२८८ मधील शेत रस्त्यावरील तारांचे कुंपण,लोखंडी गेट व इतर सर्व अडथळे तात्काळ दूर करून शेतरस्ता वहिवाटीसाठी खुला



करून पूर्ववत करण्याचे आदेश देण्यात आले.तसेच भविष्यात या रस्त्यावर प्रतिवादीने कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करू नये, असेही प्रतिवादींना निर्देश देण्यात आले.

शासन निर्णयाचा आधार

महसूल व वन विभागाच्या दि.२२ मे २०२५रोजीच्या शासन निर्णयाचा आधार घेत आधुनिक शेतीसाठी ट्रॅक्टर,रोटाव्हेटर, हार्वेस्टर यांसारखी कृषी अवजारे सहज जाऊ शकतील तसेच शेतमालाची वाहतूक सुलभ व्हावी यासाठी पारंपरिक अरुंद रस्त्यां ऐवजी किमान ३ ते ४ मीटर (सुमारे १५ फूट) रुंदीचे शेतरस्ते उपलब्ध करून देण्याची आवश्यकता या आदेशात अधोरेखित करण्यात आली आहे.

तसेच सदर शेत रस्त्याची नोंद अधिकृत पणे ७/१२ च्या 'इतर हक्क' सदरात घेण्याचे आदेशही ग्राम महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.दिनांक २४ जुलै २०२६ रोजी तहसीलदार अंबाजोगाई यांचे आदेश क्रमांक ५४६/ २०२६ यांच्या अंमलबजावणी अंतर्गत महसूल प्रशासनाने प्रत्यक्षपणे कारवाई करत शेत रस्त्यावरील लोखंडी ताराचे कुंपण काढून व इतर अडथळा दूर करून अतिक्रमित शेतरस्ता खुला केला.

यावेळी रत्नाकर भागोराम पन्हाळे,बाबू वली खा पठाण, देवानंद भगवान पाडुळे,अय्युब उस्मान खान पठाण,दत्ता साखरे, बळी घोरपडे, ॲड.शिरीषकुमार मुकडे,बाळासाहेब घोरपडे,मिलिंद बाळकृष्ण कुलकर्णी, विपिन विलासराव कुलकर्णी,खाजमिया पठाण,अमीन शेख, ज्ञानोबा सूर्यवंशी, गोविंद अण्णासाहेब जामदार,अशोक गोपीनाथ गाडवे, सुनील घोरपडे,मारुती सरवदे यांच्यासह परिसरातील नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल तसेच तात्काळ प्रत्यक्ष कारवाई करून रस्ता खुला करून दिल्या बद्दल ग्रामस्थांच्या वतीने तहसीलदार विलास तरंगे साहेब, मंडळ अधिकारी भुसेवाड साहेब,तलाठी बनसोडे साहेब तसेच महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब आणि महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या 25 लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन अभियानाला वेग

### 108 किमी नदीपात्रासह गावागावांत वृक्षलागवड जोमात

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :** गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या २५ लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाला मोठा प्रतिसाद मिळत असून, वृक्षलागडीचे काम वेगाने सुरू आहे. यावर्षी ट्रस्टने परळी, अंबाजोगाई, धारूर आणि माजलगाव तालुक्यातील पापनाशी, गुणवारा, वान, सरस्वती आणि लिंगी या नद्यांचे सुमारे १०८ किमी पुनरुज्जीवन केले असून, या नदीपात्रांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. त्याचबरोबर विविध गावांमध्ये रोपांचे वितरण करण्यात आल्याने सार्वजनिक ठिकाणे, मोकळ्या जागा आणि शेतांच्या बांधावरही लागवड सुरू आहे.

या अभियानाचा शुभारंभ ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते परळी वैजनाथ येथे झाला. या उपक्रमात अनेक नगरपालिकांसह १०० हून अधिक ग्रामपंचायती, सामाजिक संस्था आणि हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. गेल्या तीन दिवसांतच २५ लाखांहून अधिक वृक्षांची लागवड झाल्याने प्रारंभीचे २५ लाखांचे उद्दिष्ट ओलांडून ५० लाख वृक्ष लागवडीचा टप्पा गाठण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वृक्षलागवडीसोबतच त्यांच्या संवर्धनासाठीही नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येत आहेत. अभियानाच्या तिसऱ्या दिवशी पिंपळगाव गाढे, कासारवाडी, जळगव्हाण, परचुंडी आदी गावांतील नदीपात्रांमध्ये वृक्षलागवड करण्यात आली. तसेच परळी वैजनाथ, सोनपेठ आणि वडवणी नगरपरिषद क्षेत्रात घनदाट वृक्षलागवड सुरू असून, सहभागी ग्रामपंचायतींनाही मोठ्या प्रमाणावर रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

*कृषीकुल येथे आषाढी निमित्त वृक्षदिंडी*

आषाढी एकादशीच्या निमित्ताने ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात कृषेश्वर महादेव मंदिरात महापूजा आयोजित करण्यात आली.

## अभिषेक मिसाळ यांचे निधन

**बीड : प्रतिनिधी :** विविध प्रश्नांवरील आंदोलनात आणि सामाजिक कार्यात सहभागी असलेला युवा कार्यकर्ता अभिषेक सुरेश मिसाळ (31) यांचे बुधवारी रात्री हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. शहरातील जवाहर कॉलनी भागात रहिवासी असलेल्या अभिषेक मिसाळ यांनी अल्पावधीत आपली ओळख निर्माण केली होती. ज्ञानराधासह इतर पतसंस्थांमध्ये अडकलेल्या ठेवीसंदर्भात उभारलेल्या आंदोलनात ते सक्रीय होते. बुधवारी रात्री राहत्या घरी हृदयविकाराच्या धक्क्याने त्यांचे निधन झाले. गुरुवारी दुपारी अंकुशनगर भागातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आजी, आई-वडील, काका-काकी, दोन भाऊ, बहीण, असा परिवार आहे.

## सावरकर माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशी उत्साहात साजरी

### वारकऱ्यांच्या रुपातील विद्यार्थ्यांचा विठ्ठलनामाचा गजर; श्रेयस थापडेच्या कीर्तनाने जिंकली उपस्थितांची मने!

बीड (प्रतिनिधी) स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीच्या कार्यक्रमांचे अत्यंत उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण शाळा परिसर विठ्ठल नामाच्या जयघोषाने आणि भक्तीरसात न्हाऊन निघाली होती.



कार्यक्रम प्रसंगी इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी वेषात सहभागी होऊन टाळ-मृदुंगाच्या गजरात 'विठ्ठल-विठ्ठल' असा जयघोष केला. लहानग्या वारकऱ्यांच्या या रुपाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर इयत्ता ५ वी व ६ वी च्या विद्यार्थिनींनी अभंगांवर आधारित सुंदर आणि नेत्रदीपक नृत्याविष्कार सादर केला. तसेच काही विद्यार्थिनींनी आपल्या मधुर आवाजात विठ्ठलाचे विविध अभंग सादर केले.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे इयत्ता ९ वी मधील विद्यार्थी चि. श्रेयस थापडे याचे कीर्तन! श्रेयसने आपल्या ओघवत्या शैलीत अप्रतिम कीर्तन सादर करून उपस्थित शिक्षक, विद्यार्थी व पालकांची मने जिंकली. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. हरिभाऊ साबळे व सौ. माधवी डोळे यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला.

गीत गायनात श्री. मुकुंद मिरगे व श्री. सहदेव जोशी यांनी सुरेल साथसंगत केली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. आरती कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाची नियोजन संस्कार मंडळातर्फे करण्यात आले होते.

शेवटी, सर्व उपस्थितांनी भक्तिभावाने पसायदान म्हटले आणि या मंगलमय कार्यक्रमाची सांगता झाली.

## केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कूल मध्ये आषाढी दिंडी सोहळा उत्साहात संपन्न



**केज दि २५(प्रतिनिधी ) :** आषाढी एकादशीच्या दिनी चाईल्ड प्रायमरी स्कूल, केज येथे पारंपरिक आषाढी दिंडी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार, भक्ती, संस्कार आणि सामाजिक ऐक्याची भावना रुजविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी शाळेत विठ्ठल-रुक्मिणी पूजन करून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर टाळ, मृदंग, भगवे पताके आणि विठ्ठल नामाच्या गजरात दिंडी केज शहरातील आनंद नगर परिसरातून काढण्यात आली. "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल", "जय जय राम कृष्ण हरी" अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

दिंडीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मुलांनी डोक्यावर तुळशी वृंदावन, भगवी पताका, टाळ, वीणा, मृदंग अशा पारंपरिक वस्तूंसह सहभाग नोंदविला, तर विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत वारकरी संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. दिंडी मार्गावर नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. दिंडी शाळेत परतल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी रिंगण सोहळा, फुगडी, अभंग गायन, विठ्ठल नामस्मरण तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि वारकरी परंपरेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत भक्तिमय वातावरण निर्माण केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शरद गिराम यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व समजावून सांगितले. वारकरी संप्रदायाने समाजाला दिलेली समता, बंधुता, सेवा, शिस्त आणि भक्तीची शिकवण विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी पूजा गिराम ,रोहिणी साखरे ,पूजा तपसे रक्षंदा पुरी ,अर्चना राऊत , प्रियंका नेमाने,राणी जोगदंड यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच अनिल चटप, बिरूदेव भंडारे, सोमनाथ कांबळे, अजय शिंदे, अनुरथ चटप, श्रीराम जोगदंड, बालाजी कापरे, जयराम अंडील व इतर पालकांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख करून देतानाच वारकरी परंपरेचे संस्कार रुजविणारा हा उपक्रम सर्वांच्या पसंतीस उतरला. उपस्थित पालकांनी व नागरिकांनी चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

## आषाढी एकादशी निमित्त आयुष पब्लिक इंग्लिश स्कूलमध्ये भक्तिमय वातावरण



**माजलगाव प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या निमित्त आयुष पब्लिक इंग्लिश स्कूल येथे भक्ती, संस्कृती आणि परंपरेचा सुंदर संगम घडविणारा विविध सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात भव्य रिंगण सोहळ्याने झाली. त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात दिंडी व पालखी सोहळा मोठ्या उत्साहात काढण्यात आला. विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची परंपरा जपत आकर्षक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळा परिसर "ज्ञानोबा-तुकाराम" यांच्या जयघोषाने दुमदुमून गेला आणि भक्तिरसाने भारावून गेला.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले भक्तिमय नृत्य, अभंग गायन, तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. संगीत शिक्षिका श्रेया ठोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अभंग व भक्तिगीतांचे सुरेल सादरीकरण केले. तसेच अशोक राऊत यांनी सादर केलेल्या भावस्पर्शी भक्तिगीतांनी संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय केले.

याप्रसंगी शाळेचे संचालक सागर राजेंद्र करवा तसेच मुख्याध्यापिका सौ. भाग्यश्री सागर करवा उपस्थित होते. यावेळी बोलताना करवा म्हणाले की, अशा सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, संत परंपरा, नैतिक मूल्ये आणि अध्यात्माची जाणीव दृढ होते. शिक्षणाबरोबरच संस्कारांची जोपासना करणे हेच शाळेचे ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांचे सहकार्य लाभले.

# बदलतं बीड लेख क्र. 2 : आरोग्य सुविधांसाठी 1582 कोटी...!





288 खाटाचा बांधण्यात आलेला रूग्णालयातील उपचार कक्ष



स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकिय महाविद्यालयाची नवीन बांधण्यात आलेली प्रशासकिय इमारत







बीड जिल्हा विकसित करताना सर्वांगीण विकास लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य सेवेचा विस्तार देखील करण्यात येत आहे. त्यात अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या क्षमतावृद्धी सोबतच इमारतीचा देखील विस्तार करण्याचे नियोजन आहे.

अंबाजोगाई हे अनेक वर्षापासून जिल्ह्यातीलच नवे तर लगतच्या जिल्ह्यातील रूग्णांसाठी मोठे केंद्र बनलेले आहे. याठिकाणी बीडसह लातूर जिल्ह्यातून तसेच लगतच्या धाराशीव जिल्ह्यातून येणाऱ्या रूग्णांची संख्या अधिक असते. महाविद्यालय देखील असल्याने वैद्यकीय शिक्षणासाठी देखील हे महत्त्वाचे ठिकाण आहे.

**महाविद्यालय व रूग्णालयाच्या ताब्यात एकूण स्वत:**च्या नावे 58 हेक्टर जागा आहे. सध्याची उपलब्ध व्यवस्था विकसित करण्यासाठी एक बृहद आराखडा करण्यात आला आहे. यासाठी 1 हजार 106 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे.

नवीन आराखड्यात येथे परिपूर्ण असे आरोग्य व्यवस्था आणि साधने असावीत यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. अद्ययावत असे ऑपरेशन थिएटर, रेडिओलॉजी यंत्रणा, महिला व बालक कक्ष, अतिदक्षता कक्ष तसेच अत्यावश्यक सेवा ठरणारी रक्तपेढी अर्थात ब्लड बँक आणि प्रयोगशाळा या रूग्णालयात असणार आहेत.

महाविद्यालयाची आवश्यकता लक्षात घेऊन महाविद्यालयासाठी अद्ययावत असे शिक्षण कक्ष परीक्षेसाठी स्वतंत्र असा हॉल अभ्यासिका आणि ग्रंथालय या सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.

वैद्यकीय सुविधा विस्तार अंतर्गत उपचारासाठी लागणारे ऑक्सीजन व त्यासोबतची यंत्रणा अखंड वीजपुरवठा रहावा यासाठी यंत्रणा रूग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्यासह रूग्णालयासाठी अत्यावश्यक असणारी पाणीपुरवठा व्यवस्था सोबतच रूग्णालय इमारतीसाठी वातानुकुलन यंत्रणा देखील असेल.

सुरक्षा यंत्रणा ज्यात सर्व महाविद्यालय आणि रूग्णालय यांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे. रूग्णालय म्हटल्यावर बायो-मेडिकल वेस्ट मोठ्या प्रमाणावर निर्माण होत असते. त्याचे व्यवस्थापन पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरते. त्याचीही व्यवस्था या ठिकाणी उभारण्यात येईल. बीड शहर आणि अंबाजोगाई हे अंतर खूप अधिक आहे. बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने येथे असलेली जिल्हा रूग्णालय देखील अद्ययावत असणे आवश्यक आहे. याचाही विचार करून नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा रूग्णालयाची क्षमता वाढवून येथे 360 खाटांची व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी 304 कोटी रूपयांचा वेगळा आराखडा तयार करण्यात आला आहे. यात रूग्णालय इमारतीचे विस्तारीकरण प्रशासकीय इमारत बांधकाम रेडिओलॉजी, मोर्चेरी आणि पार्किंगची व्यवथा या सर्वांचा समावेश या आराखड्यात आहे.

रूग्णालयाची आवश्यकता व शिक्षण सुविधा विस्तार या अंतर्गत बीड मध्ये नवे नर्सिंग महाविद्यालय आणि वस्तीगृह देखील उभारले जाणार आहे. यासाठी 4.22 हेक्टर जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाविद्यालय आणि वस्तीगृह उभारणी यासाठी 172 कोटी रूपयांचा स्वतंत्र असा आराखडा आहे.

जिल्ह्यात सर्वांगीण विकासात आरोग्य सेवा देखील महत्त्वाची आहे. याच भूमिकेतून 1582 कोटींहून अधिकची कामे आणि सूविधा होणार असल्याने बीड जिल्ह्यात याचा फायदा होईल आणि नागरिकांना योग्य आणि माफक अशी वैद्यकीय सेवा देखील प्राप्त होईल.

**प्रशांत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**बीड - 9823199466**

## अग्रलेख

# कोंडी फुटली, बरं झालं...

कोणतेही आंदोलन वा लढाई सुरू करताना आपल्या मागण्या जशा ठरवाव्या लागतात, तसेच कुठे थांबायचे हेही आधीच ठरवावे लागते. कोणतेही आंदोलन दीर्घकाळ सुरू ठेवता येत नाही. कुठे थांबायचे हे ठरवले नसेल वा ठरवता येत नसेल तर त्यांची स्थिती रशिया-युक्रेन आणि इराण-अमेरिकेसारखी होते. रशियाने युक्रेनवर आक्रमण करून चार वर्षांपेक्षा जास्त काळ झाला आहे. पण युक्रेनचा रशियाला पाडाव करता आला नाही. अशीच स्थिती अमेरिका आणि इस्त्रायलचीही इराणच्या संदर्भात झाली आहे. तात्पर्य असे की, कोणताही संघर्ष सुरू करताना कुठे थांबायचे, कुठे माघार घ्यायची, कुठे लवचीकता दाखवायची, याची तयारी असावी लागते. काही वेळा माघार घेणे हे शहाणपणाचे ठरत असते आणि त्यालाच मुत्सद्देगिरी म्हणतात. कॉक्रोच पार्टीचे अभिजित दीपके आणि सोनम वांगचूक यांनी हटवादी भूमिका सोडून अखेर समन्वयाची भूमिका घेतली आणि सरकारकडून त्यांना प्रतिसाद मिळतोय, हे चांगले झाले. यात कुणाचा विजय वा पराजय झालेला नाही. त्या अर्थाने कुणीही या घटनाक्रमाचे विश्लेषण करू नये. नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या पृष्ठभूमीवर लाखो विद्यार्थ्यांच्या मनात आक्रोश निर्माण झाला होता. विद्यार्थी हवालदिल झाले. फेरपरीक्षा झाली. तिचा निकाल लागला. पण, यंदाच्या पहिल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटीमुळे विद्यार्थी-पालक अस्वस्थ झाले होते. पेपरफुटीचा निषेध आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू झाले. शुक्रवारी सरकार आणि कॉक्रोच जनता पार्टी यांच्यात चर्चेची पहिली फेरी झाली. सरकारतर्फे आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह सहभागी झाले. चर्चेच्या पहिल्याच फेरीत सर्व मागण्यांवर तोडगा निघेल, अशी अपेक्षा करता येत नाही. पण आतापर्यंत सरकार आणि आंदोलक यांच्या संघर्षाच्या निमित्ताने निर्माण झालेली कोंडी फुटली, ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर सरकारची भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुरुवारच्या ट्विटवरून स्पष्ट झाली होती. त्यानंतर त्यांनी थेट संवादही साधला. विद्यार्थ्यांचे हित आणि कल्याण याला आपण सर्वोच्च प्राधान्य देऊ आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कुणालाही खेळू दिले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. पेपरफूट प्रकरणातील गुन्हेगारांसाठी फास्ट ट्रॅक न्यायालय स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली होती. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबद्दल सरकार आधीपासूनच गंभीर होते. ते गांभीर्य शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयातूनही दिसले. नीट परीक्षेतील गैरव्यवहाराच्या विरोधात कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन जंतरमंतरवर सुरू होऊन महिना लोटला. लडाखमधील पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक या आंदोलनात उतरले. सोनम वांगचूक यांचे उपोषण संपले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनात वांगचूक का उतरले, हा प्रश्न आता गैरलागू ठरतो. जंतरमंतरवरील आंदोलनाचे नेतृत्व अभिजित दीपके करीत असले, तरी आतापर्यंत त्यांचा चेहरा सगळ्यांसाठीच अनोळखी होता. पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांच्यामुळे आंदोलनाला चेहरा मिळाला. त्यांच्यामुळेच देशाचे लक्ष या आंदोलनाकडे वेधले गेले, हे अमान्य करता येत नाही.

उपोषणामुळे सोनम वांगचूक यांची प्रकृती ढासळली, दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि वैद्यकीय सल्ल्याने पोलिसांनी वांगचूक यांना आधी सफदरजंग रुग्णालयात हलवले. पण रुग्णालयातही त्यांनी आपले उपोषण सुरू ठेवले. न्यायालयाच्याच आदेशाने नंतर वांगचूक यांना मेदांता रुग्णालयात हलवण्यात आले. तेथेही त्यांचे उपोषण सुरू पोते. वांगचूक यांच्या रुग्णालयातील उपोषणामुळे सरकारवर दोन आघाड्यांवरून दबाव येत होता. तोपर्यंत शांततापूर्ण असलेल्या जंतरमंतरवरील आंदोलनाला सोमवार, २० जुलैपासून हिंसक वळण लागले. त्याचदिवशी सरकारने कॉक्रोच पार्टीच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावले. त्यांच्याशी चर्चा सुरू केली. बुधवार आणि गुरुवारपासून केंद्र सरकारने आंदोलकांसमोर चार वेळा चर्चेचे प्रस्ताव ठेवले होते. पण आंदोलक आपल्या मागण्यांवर अडले होते. आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी वा कार्यालयात चर्चेला या, असे सरकारचे आंदोलकांना खुले निमंत्रण होते. पण याठिकाणी चर्चेची कॉक्रोच पार्टीच्या प्रतिनिधींची तयारी नव्हती. त्यांनी कॉन्स्टिट्युशन क्लबमध्ये चर्चेची मागणी केली आणि सरकारनेही प्रतिष्ठेचा मुद्दा न बनवता त्याठिकाणी चर्चेची तयारी दाखवत कोंडी फोडली. चर्चा कुठे झाली हा महत्त्वाचा मुद्दा नाही, तर चर्चा झाली आणि पुढच्या उपायांचा मार्ग मोकळा झाला, ही समाधानाची बाब आहे.

यानिमित्ताने दिल्लीत निर्माण झालेल्या परिस्थितीवरही लक्ष दिले पाहिजे. आंदोलनाला हिंसक वळण लागल्यामुळे आणि गोंधळाची स्थिती निर्माण झाल्यामुळे दिल्लीकर नाराज झाले आहेत. कोणत्याही आंदोलनाला हिंसक वळण लागते, तेव्हा त्याचा फटका निरपराध नागरिकांनाच सर्वाधिक बसत असतो. दुकानांचे आणि शासकीय मालमत्तेचे नुकसान होत असते. तळहातावरचे जीणे जगणाऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसतो. याचा अनुभव दिल्लीकर सध्या घेत आहेत. लुटियेन्स दिल्ली म्हणून राजधानीचा जो भाग आहे, तो या आंदोलनामुळे मोठ्या प्रमाणात प्रभावित झाला आहे. या भागातील इंटरनेट सेवा पाच दिवसांपासून बंद करण्यात आली. जवळपास दीड डझनभर मेट्रो स्थानकेही बंद झाली. याचा फटका राजधानीतील काही लाख लोकांना बसला. आतापर्यंत तरी विद्यार्थ्यांच्या मागण्या आणि त्यासाठी सुरू असलेले आंदोलन याबद्दल जनतेला सहानुभूती आहे. कारण नीटच्या पेपरफुटीमुळे दुखावल्या गेलेल्या लोकांमध्ये दिल्लीकरही आहेतच. यापुढे जनतेच्या संयमाचा कडेलोट होणार नाही, याची काळजी आंदोलनाच्या नेत्यांनी घेतली पाहिजे. त्यांनी जबाबदारीने वागले पाहिजे. शिवाय, आंदोलकांनी पोलिसांच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, असेही सुचवावेसे वाटते. ती घेतली गेली तर काय अनवस्था प्रसंग उद्‌भवेल काही सांगता येत नाही. आता चर्चा सुरू झाली आहे तर ती विधायक पद्धतीने पुढे गेली पाहिजे. सरकारने आंदोलकांच्या भावना आणि मागण्या समजून घेतल्या पाहिजे आणि दोघांनीही सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. आंदोलकांच्या तीनपैकी दोन मागण्यांवर सरकारने सहमती दर्शविली आहे. नीट पेपरफुटीमुळे निर्माण झालेल्या स्थितीत आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपये नुकसानभरपाई द्यावी तसेच आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, या त्या मागण्या आहे. आता शिल्लक राहिलेला मुद्दा आहे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा न घेण्यावर सरकार ठाम आहे, तर त्यांचा राजीनामा मागण्यावर आंदोलक अडले आहेत. संसदेत विरोधी पक्षांनीही याच मागणीसाठी दोन्ही सभागृहांचे कामकाज ठप्प पाडले आहे. त्यामुळे या मुद्यावर कोण एक पाऊल मागे घेतो, यावर या आंदोलनाचे भवितव्य अवलंबून असेल. कुणाला तरी तडजोड स्वीकारावी लागेल. दोन्ही बाजू आपापल्या भूमिकांवर ठाम राहिल्या तर या विषयाला विधायक वळण मिळणार नाही. कदाचित त्या स्थितीत नवे मुद्दे उपस्थित होतील. आपल्या भूमिकेवर ठाम राहण्यात गैर काही नाही, पण ताठर आणि आडमुठी भूमिका न घेता लवचीक भूमिका अशा प्रसंगी सर्वांकडून घेतली गेली पाहिजे. कुणाच्याही व्यक्तिगत किंवा राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा समाजाचे आणि देशाचे पर्यायाने देशातील सर्वसामान्य जनतेचे आणि विद्यार्थ्यांचे व्यापक हित महत्त्वाचे असते, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे. शेवटी देश म्हणजे देशातील माणसेच असतात. विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहे, असे आपण म्हणत असू तर वर्तमानात आपले वर्तन ही भविष्याची पायाभरणी असेल हे दोन्ही बाजूंनी लक्षात ठेवलेले उत्तम. ■

## विशेष

डॉ. साधना पटवर्धन

# टेस्ट ट्यूब बेबी सेंटर : गौरवशाली प्रवास

**IVF (इन विट्रो फर्टिलायझेशन) ही एक आधुनिक वैद्यकीय उपचार पद्धती आहे, जी वंध्यत्वावर मात करून दाम्पत्यांना पालक होण्यास मदत करते. ही प्रक्रिया सामान्यतः 'टेस्ट ट्युब बेबी' म्हणूनही ओळखली जाते. आज जागतिक आयव्हीएफ दिन आहे. त्यानिमित्त...**

नागपूरमधील केतकर हॉस्पिटल आणि नागपूर टेस्ट ट्यूब बेबी सेंटर (NTTBC) या संस्थांच्या संस्थापक, संचालक व ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ स्व. डॉ. मंगला केतकर यांनी गेल्या चार दशकांहून अधिक काळ मध्य भारतातील महिला आरोग्य, प्रसूती सेवा आणि वंध्यत्व उपचार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या दूरदृष्टी, सेवाभाव आणि वैद्यकीय उत्कृष्टतेमुळे केतकर हॉस्पिटल हे मध्य भारतातील अत्याधुनिक प्रसूती रुग्णालय म्हणून ओळखले जाते. सन २००० मध्ये वाढत्या वंध्यत्वाच्या समस्येची जाणीव ठेवून आधुनिक, सर्वसमावेशक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपचार देण्याच्या उद्देशाने एनटीटीबीसीची स्थापना करण्यात आली. आज एनटीटीबीसी हे मध्य भारतातील जागतिक दर्जाच्या सुविधा, अनुभवी तज्ज्ञांची टीम आणि उच्च यशदरासाठी ओळखले जाणारे अग्रगण्य आयव्हीएफ केंद्र आहे. देशभरातून तसेच परदेशातूनही रुग्ण येथे उपचारासाठी येतात.

एनटीटीबीसीला सन २००० मध्ये आयएसएआरकडून मानांकन प्राप्त झाले आहे. यांच्या निकषांनुसार केंद्रातील पायाभूत सुविधा, अत्याधुनिक उपकरणे आणि गुणवत्ता व्यवस्थापनाची यशस्वी तपासणी करण्यात आली.




ही मान्यता संस्थेच्या उच्च दर्जाच्या सेवा, गुणवत्ता आणि रुग्णकेंद्री दृष्टिकोनाची साक्ष आहे. वंध्यत्व उपचार, संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, अध्यापन आणि वैद्यकीय सल्लागार सेवा या सर्व क्षेत्रांत एनटीटीबीसीने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. अनुभवी तज्ज्ञांची समर्पित टीम, वैज्ञानिक दृष्टिकोन, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि रुग्णांप्रति असलेली निष्ठा यामुळे एनटीटीबीसी मध्य भारतातील विश्वासार्ह आणि अग्रगण्य आयव्हीएफ केंद्र म्हणून कार्यरत आहे. गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ नागपूरवंध्यत्व उपचार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत हजारो दाम्पत्यांच्या आयुष्यात पालकत्वाचा आनंद फुलवला आहे. रुग्णसेवेबरोबरच वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनालाही संस्थेने नेहमीच प्राधान्य दिले असून दरवर्षी नियमितपणे वैद्यकीय सेवेंतर्गत कार्यक्रमांचे व चर्चासत्राचे आयोजन केले जाते तसेच 'फॉग्सी'च्या मान्यताप्राप्त प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे अल्ट्रासोनोग्राफी आणि वंध्यत्व उपचारांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

काळानुरूप नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत संस्थेने प्रयोगशाळेत गर्भ सुरक्षित ठेवणाऱ्या आधुनिक प्रणालीचा वापर सुरू केला असून भ्रूण तपासणी प्रक्रियेसारख्या प्रगत जनुकीय तपासण्यांची सुविधाही उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे ही संस्था केवळ उपचार केंद्र नसून शिक्षण, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम असलेले अग्रगण्य प्रजनन केंद्र ठरले आहे.

कोणतीही संस्था केवळ एका व्यक्तीच्या कार्यामुळे नव्हे, तर समर्पित आणि कुशल टीमच्या अथक परिश्रमामुळे यशस्वी ठरते. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. साधना पटवर्धन, डॉ. सुनीता सोहोनी, डॉ. सुनीता जैस्वाल, डॉ. अश्लेषा पटवर्धन, डॉ. रेणुका पैठणकर, डॉ. अदिती कासवा; भ्रूणशास्त्रज्ञ डॉ. स्वाती ताले, श्रिया फुटाणे, नेहा नवले; परिचारिका श्रद्धा चरडे, निशा सहारे, कुंदा मस्के व प्रशासकीय कर्मचारी अश्विनी वाघ, पल्लवी मोहरील, वैष्णवी ठाकरे अशा संपूर्ण टीमच्या समन्वित प्रयत्नांमुळे नागपूर टेस्ट ट्यूब बेबी सेंटर आजही उत्कृष्ट यशस्वितेचे प्रमाण, आधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णकेंद्रित सेवेसह हजारो कुटुंबांच्या आयुष्यात आनंदाची नवी पहाट घडवत आहे. संस्थापक स्व. डॉ. मंगला केतकर यांनी रुजविलेली सेवाभाव, गुणवत्ता आणि विश्वासाची परंपरा गेल्या २५ वर्षांपासून याच समर्पित टीमच्या माध्यमातून यशस्वीपणे पुढे सुरू आहे. ■

## वेध

विजय कुळकर्णी

# अविवाहितांची वाढती संख्या गंभीर सामाजिक समस्या

तरुण-तरुणी अविवाहित राहण्याचे वाढते प्रमाण ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण होणार आहेत. जीवनाचा एक टप्पा असा येतो की, तेथे एका जोडीदाराची नितांत गरज भासते. जोडीदार नसेल तर पद, पैसा, प्रतिष्ठा याला काहीच अर्थ उरत नाही. एका आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासातून असा निष्कर्ष निघाला आहे की, आगामी ६ वर्षात जगातील अंदाजे ४० टक्क्यांपेक्षा जास्त महिला अविवाहित राहतील. हा अहवाल एका वृत्तपत्रात मे २०२६ मध्ये प्रसिद्ध झाला आहे. मॉर्गन स्टॅनली याच्याअभ्यासाचा आधार घेण्यात आला आहे.

आजच्या महिला उच्चशिक्षित, करीअरला प्राधान्य देणाऱ्या आहेत. त्या स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या सक्षम असून कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाहीत. त्यांना स्वातंत्र्य आवडते. आपल्या आयुष्याचे निर्णय त्या स्वतः घेऊ इच्छितात. लग्न, मातृत्व, कौटुंबिक जबाबदाऱ्यांना त्या आपल्या प्रगतीच्या मार्गातील अडथळे मानतात. हे असेच सुरू राहिल्यास पारंपरिक कौटुंबिक रचना आणि सामाजिक चौकट विस्कटून जाईल. तसेच, काही महिला त्यांच्या आई-वडिलांना एकुलत्या एक असतात. त्यामुळे आपल्या माता-पित्यांची जबाबदारी कोण सांभाळेल? होणारा नवरा किंवा सासरची मंडळी त्यांना स्वीकारतील का? इत्यादी प्रश्न त्यांच्या समोर असतात. मात्र, त्यांच्या अविवाहित राहण्याच्या निर्णयामुळे लोकसंख्या घटणे, अविवाहित पुरुषांची संख्या वाढणे, वार्धक्याच्यावेळी एकाकीपणाची समस्या बळावते. अनेक आई-वडील त्यांच्या मुलींसाठी स्थळे शोधत आहेत. पण, मुलींना स्वतःलाच लग्न करण्याची इच्छा नाही. आजही समाजातील एक मोठा वर्ग या सामाजिक समस्येपासून अनभिज्ञ आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी सरकारने मुलींचे लग्नाचे वय १८ वर्षे निश्चित केले. तरीही आज मुली किमान पदवीधर होतात. नोकरी करतात. त्यामुळे मुलींच्या लग्नाचे वय २३ ते २६ वर्षादरम्यान योग्य मानले जाते. यासाठी सामूहिक स्तरावर जनजागृती आणि प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या हिंदू संस्कृतीत १६ संस्कार सांगितले आहेत. लग्न हा त्याच संस्कारांपैकी एक आहे. तसेच, विवाह ही एक संस्था मानली जाते. विवाह संस्था टिकल्यास कुटुंब आणि समाज व्यवस्था कायम राहील. वैयक्तिक जीवनात संतुलन राखणे हीच खरी प्रगती आहे. मुलीचे लग्न २० व्या वर्षी झाल्यास एका शतकात किमान ५ पिढ्या होत होत्या. २५ व्या वर्षी झाल्यास ४ पिढ्या आणि आता मुली ३० वर्षांच्या होत आहेत. तेव्हा एका शतकात केवळ ३ पिढ्या होत आहेत. त्यामुळे आपला समाज पुढील शतकापर्यंत टिकेल का? लग्न मोडण्याची अनेक कारणे आहेत. मुख्य कारण म्हणजे मुला-मुलींचे वय. वयामुळे अनेक शारीरिक बाधा निर्माण होतात. त्यामुळे संततिप्राप्तीचे योग कमी होतात. परिणामी सहजीवन सुखकर नसल्याने काडीमोड घेतला जातो. परिणामी मोडलेले कुटुंब, दुःखी आणि एकाकी पडलेले आई-वडील, एक पिढी मोठी पोकळी अनुभवत असते. जर ५० जोडप्यांना एकच अपत्य असेल तर पुढच्या पिढीतील मुलांची संख्या नगण्य राहते. हे असेच सुरू राहिल्यास तिसरी पिढी जवळपास नाहीशीच होईल. शहरात मोठमोठ्या इमारती आहेत. पण, त्यातील संयुक्त कुटुंब व्यवस्था नाहीशी झाली आहे. मुलांना वेळेवर ना नोकऱ्या मिळत आहेत, ना वेळेवर लग्न होत आहे. परिणामी मुले समाजासोबत राहण्यापेक्षा एकटे राहणे पसंत करतात. विभक्त कुटुंब पद्धतीत वाढ झाली आहे. वाढत्या वयामुळे अनेक जण अविवाहित आहेत. लग्न, कुटुंब, अपत्य हे या तरुण-तरुणींना नकोसे वाटत आहे. पण, लग्न हे केवळ संसारिक बंधन नसून ते घर, कुटुंब आणि समाजाचा मुख्य आधार आहे. लग्नाला आपल्याकडे संस्था म्हणून मान्यता आहे. तो वंश, सभ्यता आणि संस्कृती पुढे नेण्याचा मार्ग आहे. मजबूत कौटुंबिक रचनेच्या अभावामुळे आज जगातील बहुतांश देश आणि भारतातही कौटुंबिक परंपरा ऱ्हास पावत आहे. रक्ताची नाती नष्ट होत आहेत. याचा विचार करता या गंभीर समस्येतून मार्ग काढण्यासाठी कौटुंबिक प्रबोधन आजच्या काळाची नितांत गरज आहे. ■

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# राजकीय सोय आणि स्वार्थ

भारतातील शिक्षण व्यवस्था आणि भरती प्रक्रिया आज एका अत्यंत गंभीर वळणावर येऊन पोहोचली आहे. ज्या देशात तरुण पिढीला राष्ट्रनिर्माणाचा कणा मानले जाते, त्याच देशात आज लाखो गुणवंत आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा रोज लिलाव मांडला जात आहे. परीक्षा कोणतीही असो, केंद्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा असो वा राज्यातील भरती प्रक्रिया, 'पेपर लीक' आणि घोटाळे हा जणू एक नियमच बनला आहे. दुर्दैवाने या देशातील राजकीय व्यवस्थेने या गंभीर विषयाला केवळ आपल्या सोयीचे राजकीय खेळणे बनवून ठेवले आहे. जेव्हा स्वतःच्या सरकारांच्या काळात पेपर लीक होतात, तेव्हा हा निव्वळ प्रशासकीय दोष किंवा सिस्टिमची चूक मानून गप्प बसणारे नेते सत्ता हातातून जाताच अचानक रस्त्यावर उतरून विद्यार्थ्यांच्या हिताचा आव आणू लागतात. हा दुटप्पीपणा केवळ निंदनीय नसून देशातील तरुण पिढीचा विश्वासघात करणारा आहे. या देशाला आणि इथल्या व्यवस्थेला जर खरोखरच बदलायचे असेल, तर राजकारणाचा हा खेळ आधी उघडा पाडावा लागेल.

'पेपर लीक' हा काही आज किंवा काल सुरू झालेला प्रकार नाही. गेल्या अनेक दशकांत विविध राज्यांमध्ये आणि वेगवेगळ्या पक्षांच्या राजवटीत भरती परीक्षांचे कागद बाजारात विकले गेले आहेत. राजस्थानमधील काँग्रेसच्या गहलोत सरकारच्या काळात एकापाठोपाठ एक अनेक परीक्षांचे पेपर फुटले, हजारो मुलांचे भविष्य टांगणीला लागले, पण त्या वेळी काँग्रेसचे दिल्लीतील नेतृत्व किंवा इतर राज्यांतील त्यांचे मोठे नेते आपल्याच सरकारच्या अपयशावर मूग गिळून गप्प बसले होते. स्वतःच्या पक्षाच्या शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा मागण्याची हिंमत कोणी दाखवली नाही. त्यावेळी राहुल गांधी, प्रियांका वढेरा त्या सरकारचा बचाव करताना दिसले. आजही तीच परिस्थिती आहे. कर्नाटक, केरळ आणि पंजाबमध्ये अशाच प्रकारचे आंदोलन करणाऱ्या तरुणांवर लाठीचार्ज, पाण्याचा मारा करण्यात आला. आता तेथील पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी अद्याप या लोकांनी केलेली नाही. यातूनच यांचा ढोंगी आणि दुटप्पीपणा उघड होतो.

महाराष्ट्रातही उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना झालेला 'टीईटी' घोटाळा हा राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठा आणि काळा डाग ठरला. ज्या घोटाळ्यात थेट आयएएस अधिकारी, परीक्षा परिषदेचे प्रमुख आणि तत्कालीन मंत्र्यांचे निकटवर्तीय सामील होते आणि जिथे नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पैसे घेऊन मागील दाराने पास करण्याचे रॅकेट चालवले गेले, त्या घोटाळ्याचे सूत्रधार आज दिल्लीतील जंतर-मंतरवर जाऊन विद्यार्थ्यांच्या हक्कांच्या बाता मारत आहेत. हा प्रकार म्हणजे 'आपलं ठेवायचं झाकून आणि दुसऱ्याचं पाहायचं वाकून' या वृत्तीचा जिवंत पुरावा आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात तर या दुटप्पीपणाची परिसीमाच झाली आहे. कालपर्यंत जे लोक राजकीय फायद्यासाठी आणि मतांच्या लाचारापोटी हिरवे झेंडे फडकवणाऱ्याच्या मेळाव्यांना डोक्यावर घेत होते, ज्यांच्या सभांमध्ये आणि प्रचार रॅलींमध्ये राष्ट्रध्वजापेक्षा इतरच झेंड्यांचे कौतुक केले जात होते, त्यांना आता अचानक तिरंग्याचा पुळका आला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत व्होट बँकेचे राजकारण करण्यासाठी पाकिस्तानच्या झेंड्यासारखे दिसणारे झेंडे मिरवणाऱ्यांना आज 'तिरंगा मोर्चा' काढताना जराही लाज वाटत नाही. 'ठाकरे बंधूंनो', तुम्ही कितीही नाटके करा, कितीही मोर्चे काढा किंवा शब्दांचे खेळ रचा, तुमचा खरा चेहरा आणि राजकीय सोयीचे राजकारण आज महाराष्ट्रातील जनतेसमोर पूर्णपणे उघडे पडले आहे. सत्तेवर असताना स्वतःच्या मंत्रिमंडळातील घोटाळे दाबायचे, परीक्षांमधील भ्रष्टाचार उघड्या डोळ्यांनी पाहायचा आणि सत्ता गेल्यावर देशभक्तीचा अन् विद्यार्थ्यांच्या हिताचा आव आणत तिरंगा हातात घ्यायचा, हा केवळ राजकीय स्टंट आहे. या संधिसाधू आकलनाला जनता आता भुलणार नाही, कारण तुमची ही सोयीची राष्ट्रभक्ती संपूर्ण राज्याने जवळून पाहिली आहे.

आंदोलने करणे आणि संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करून सरकारला जाब विचारणे हा लोकशाहीचा आत्मा आहे, यात शंका नाही. परंतु, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांच्या खांद्यावर स्वतःच्या राजकीय अस्तित्वाची बंदूक ठेवून ज्या प्रकारे आंदोलने भरकटवली जात आहेत, ते अत्यंत भयानक आहे. दिल्लीच्या व्यासपीठावरून विद्यार्थ्यांच्या मुद्यांवर चर्चा करण्याऐवजी देशाच्या पंतप्रधानांना 'सांड', 'तानाशहा' किंवा 'घटिया' म्हणण्यापर्यंत राजकीय नेत्यांची आणि तथाकथित आंदोलकांची भाषा घसरली आहे. संविधानाचा दाखला देऊन देशाच्या सर्वोच्च आणि संवैधानिक पदावरील व्यक्तीला उघडपणे अपशब्द वापरायचे, धार्मिक शिवीगाळ करायची आणि तरीही देशात हुकूमशाही आहे असा आक्रोश करायचा, याला लाजीरवाण्या नौटंकीशिवाय दुसरं काय म्हणता येईल? जर खरोखरच देशात हुकूमशाही असती, तर अशा भाषेचा वापर करून उघडपणे सांडासारखे मोकाट फिरणे शक्य झाले असते का, हा प्रश्न अशी भाषा वापरणाऱ्या प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे.

अशा राजकीय गोंधळात आणि कॅमेऱ्यासमोर रील्स बनवणाऱ्या सेलिब्रेटींच्या गदारोळात मूळ विद्यार्थ्यांचा आवाज दाबला जातो. आंदोलनात दगडफेक करून हिंसाचार पसरवणारे आणि पोलिसांवर हल्ले करणारे लोक हे कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे हितचिंतक असूच शकत नाहीत. ते केवळ आंदोलनाचा फायदा घेऊन देशात आणि राज्यात अराजकता निर्माण करू पाहणारे घटक आहेत. राजकीय पक्षांची जमीन सरकली की त्यांना जंतर-मंतर आठवते आणि ते गमावलेले राजकीय अस्तित्व शोधण्यासाठी विद्यार्थ्यांच्या दुःखाचा बाजार मांडतात. परंतु, आता वेळ आली आहे की, विद्यार्थ्यांनी आणि देशातील जनतेने या राजकीय संधिसाधूपणाला ओळखावे. सत्तेत कोणताही पक्ष असो, पेपर लीकच्या प्रत्येक प्रकरणावर समान निकष लावून दोषींवर कठोर आणि अजामीनपात्र कारवाई झालीच पाहिजे. परीक्षा पद्धतीतील पारदर्शकता, दोषींना जन्मठेपेची शिक्षा आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याचे रक्षण हीच काळाची गरज आहे. राजकीय नेत्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी भाषेचा दर्जा घालवणे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणे आता तरी कायमचे थांबवले पाहिजे. ■

९२७०३३३८८६

## प्रासंगिक

प्रा. अजिंक्य भांडारकर

# बहुआयामी साहित्यिक व राष्ट्रप्रेमी कवी वसंत बापट

**मराठी साहित्यातील तेजस्वी कवी, प्रखर राष्ट्रभक्त, प्रभावी वक्ते, अभ्यासू प्राध्यापक, शाहीर आणि सामाजिक कार्यकर्ते अशी बहुआयामी ओळख लाभलेले विश्वनाथ वामन बापट ऊर्फ वसंत बापट यांची २५ जुलै २०२६ रोजी १०४ वी जयंती. त्यानिमित्त...**

२५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कराड येथे जन्मलेल्या वसंत बापट यांनी साहित्य, संस्कृती, शिक्षण आणि सामाजिक प्रबोधन या सर्व क्षेत्रांत आपल्या कार्याचा अमिट ठसा उमटविला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कवीची संवेदनशीलता, स्वातंत्र्यसैनिकाची जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा आणि समाजप्रबोधनाची अखंड तळमळ यांचा संगम दिसून येतो. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात तरुण वयात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या लढ्यात भूमिगत राहून काम केल्यामुळे त्यांना ऑगस्ट १९४३ ते जानेवारी १९४५ या काळात कारावास भोगावा लागला. साने गुरुजींचे संस्कार आणि राष्ट्र सेवा दलातील कार्यामुळे त्यांच्यातील सामाजिक बांधिलकी अधिक दृढ झाली. आयुष्यभर ते राष्ट्र सेवा दलाशी जोडलेले राहिले आणि कला, साहित्य व लोकचळवळींच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य करीत राहिले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी शिक्षण पूर्ण करून मुंबईतील नॅशनल कॉलेज आणि रामनारायण रुईया महाविद्यालयात मराठी व संस्कृत विषयांचे प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ अध्यापन केले. पुढे मुंबई विद्यापीठातील गुरुदेव रवींद्रनाथ टागोर अध्यासनाचे प्रमुख म्हणूनही कार्य केले. अध्यापन हा त्यांच्यासाठी केवळ व्यवसाय नव्हता; विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची ती एक प्रेरणादायी साधना होती.

वसंत बापट यांचा पहिला काव्यसंग्रह 'बिजली' (१९५२) प्रकाशित झाला आणि मराठी कवितेला एक नवे, सशक्त व्यक्तिमत्त्व लाभले. त्यानंतर 'अकरावी दिशा', 'सकीना', 'मानसी', 'सेतू', 'तेजसी', 'राजसी', 'शिंग फुंकिले रणी' अशा अनेक काव्यसंग्रहांनी त्यांच्या काव्यविश्वाला समृद्ध केले. सामाजिक विषमता, राष्ट्रप्रेम, मानवी मूल्ये, निसर्ग, प्रेम, शृंगार आणि जीवनदर्शन अशा विविध विषयांना त्यांनी समर्थपणे कवितेत स्थान दिले. त्यांच्या कवितेत संस्कृतची अभिजातता, बंगाली साहित्याचा मानवतावाद आणि लोकभाषेची सहजता यांचा सुंदर मिलाफ आढळतो. वसंत बापट हे केवळ कवी नव्हते, तर लोकशाहीरही होते. पोवाडे, लावण्या, देशभक्तिपर गीते आणि प्रबोधनपर रचनांच्या माध्यमातून त्यांनी सामान्य जनतेपर्यंत सामाजिक संदेश पोहोचविला. 'उत्तुंग आमुची उत्तर सीमा', 'संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा', 'देह मंदिर चित्त मंदिर', 'गगन सदन तेजोमय', 'छडी लागे छम छम' यांसारख्या त्यांच्या रचना लोकप्रिय आहेत. बालसाहित्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान देत 'चंगामंगा', 'अबडक तबडक', 'फुलराणीच्या कविता', 'परीच्या राज्यात' यांसारखे बालकवितासंग्रह आणि 'बालगोविंद' हे बालनाट्य लिहिले.

छोटेसे बहीण-भाऊ,
उद्याला मोठाले होऊ
उद्याच्या जगाला, उद्याच्या युगाला
नवीन आकार देऊ
ओसाड उजाड जागा,
होतील सुंदर बागा
शेतांना मळ्यांना, फुलांना फळांना
नवीन बहार देऊ
मोकळ्या आभाळीं जाऊ,
मोकळ्या गळ्याने गाऊ
निर्मळ मनाने, आनंदभराने
आनंद देऊ अन घेऊ
प्रेमाने एकत्र राहू,
नवीन जीवन पाहू,
अनेक देशांचे, भाषांचे, वेशांचे
अनेक एकत्र होऊ

हे गीत गात आजही बालकांच्या मनावर अधिक संस्कार करताना आपण सर्व मोठे झाले आहोत. समीक्षक, संपादक आणि विचारवंत म्हणूनही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. 'साधना' साप्ताहिकाच्या संपादनातून त्यांनी प्रबोधनवादी विचारांना दिशा दिली. 'तौलनिक साहित्याभ्यास', 'विसाजीपंताची बखर', 'बारा गावचं पाणी' यांसारख्या ग्रंथांतून त्यांची चिंतनशील लेखणी दिसून येते. देश-विदेशातील साहित्य संमेलनांत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. १९९९ मध्ये मुंबई येथे झालेल्या ७२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर यांच्यासह त्यांनी मराठी कवितावाचनाची नवी परंपरा निर्माण केली. त्यांच्या सादरीकरणातील ओज, अभिनय, वक्तृत्व आणि रसिकांशी साधलेला जिव्हाळ्याचा संवाद यामुळे कवितावाचन हा एक सांस्कृतिक सोहळा बनला. १७ सप्टेंबर २००२ रोजी वसंत बापट यांचे निधन झाले; मात्र त्यांचे साहित्य, विचार आणि राष्ट्रप्रेम आजही समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करण्याची आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचा वैचारिक वारसा पोहोचविण्याची आवश्यकता आहे, असे केले तर हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली ठरेल. ■

चामोर्शी/ ९४२०३६६००६

## वाचक पत्रे

### ...तर पेस्ट कंट्रोल करावे लागेल

झुरळ हे नाव ऐकले की बाथरूममध्ये दिसणारा किळसवाणा कीटक आठवतो म्हणून फारसे लक्ष दिले जात नाही. पण मर्यादेपेक्षा जास्त झुरळं जमा झाली तर सामान्यपणे कीटकनाशक फवारणीच केली जाते. आज थोडीशी फवारणी झाली असे कळले. चांगलेच झाले. तसाही एवढा गोंधळ कशासाठी? पेपर लीक झाला. हो, ती मोठी चूक होती. त्याचा निषेध व्हायलाच हवा, टीका व्हायलाच हवी. पण पूर्ण सत्य सांगायला हवे ना. एनटीएच्या परीक्षा पॅनेलमध्ये असलेल्या पुण्यातील शिक्षकांनी प्रश्नपत्रिकेची माहिती बाहेर दिल्याचा आरोप झाला. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात काही विद्यार्थ्यांना त्यांनी विशेष वर्ग घेऊन हे प्रश्न शिकवले. त्यांनी प्रश्नपत्रिकेची प्रत दिली नाही, तर फक्त प्रश्न समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी ते प्रश्न लिहून घेतले आणि ते मोबाईलच्या माध्यमातून वेगाने पसरले. काही क्षणांतच लाखो रुपये देऊन हे प्रश्न मिळविण्याची स्पर्धा सुरू झाली. परीक्षा झाल्यानंतर दुसऱ्या शिक्षकाने १३२ पैकी १११ प्रश्न या फिरणाऱ्या नमुना प्रश्नपत्रिकेशी जुळत असल्याचे लक्षात आणून दिले आणि पोलिसांकडे तक्रार केली. यानंतर परीक्षा रद्द करून पुन्हा घ्यावी लागली. प्रश्नपत्रिकेच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर सीबीआयने तपास केला आणि तपास अहवालात वरील बाबी समोर आल्या. प्रश्नपत्रिका व्यवस्थेत बदल करण्याचे निर्णय घेण्यात आले. त्यानंतर अटकेपावेतो सर्व घडामोडी घडल्या.

आता प्रश्न विचारावा लागेल. केवळ रस्त्यावर उतरून गोंधळ घालण्यात काय अर्थ आहे? देश अस्थिर करण्याच्या उद्देशाने हे होत असेल, तर केवळ कीटकनाशक फवारणी नव्हे तर संपूर्ण पेस्ट कंट्रोल करावे लागेल. ■

**विलास कुटे**/पुणे

हे पत्र **मालक, सोलापूर तरुण भारत मिडीया लिमिटेड** करिता, **मुद्रक, प्रकाशक** कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत प्लॉट नं. ए- ३२ छत्रपती संभाजीनगर, इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद ४३१००५ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. **संपादक** : विजयकुमार माधवराव पिसे. / **कार्यकारी संपादक** : प्रशांत वसंतराव माने

E-mail - stbaurangabad@gmail.com, Mob : 8888847268

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, published by MR.KULBHUSHANRAM RAMAKRISHNA TARE Printed at CHATRAPATI SAMBHAJINAGAR INDUSTRIAL CO OP SOCIETY, CHATRAPATI SAMBHAJINAGAR 431005.(Maharashtra) **Editor** : Mr.VIJAYKUMAR MADHAVRAO PISE. / **Exicutive Editor** : Mr. PRASHANT VASANTRAO MANE. E-mail : stbaurangabad@gmail.com Mobile : 8888847268.

## विश्लेषण

प्रणयकुमार

# ‘भारतबोध’; संस्कृतीचा अखंड प्रवाह



अलीकडच्या काळात ‘भारतबोध’ या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तरीही, सर्वप्रथम हा प्रश्न उपस्थित होतो की ‘भारत’ म्हणजे नक्की काय? तो केवळ एक भौगोलिक प्रदेश, राजकीय घटक किंवा सार्वभौम राष्ट्र-राज्य आहे का? की त्यात अशी काही वैशिष्ट्ये आहेत जी हिमालयापासून हिंद महासागरापर्यंतच्या या विशाल भूभागाला एका सजीव समाजाच्या आणि सनातन राष्ट्राच्या रूपात घडवतात? पाश्चात्त्य जगात राष्ट्र ही संकल्पना प्रामुख्याने ‘राज्य-केंद्रित’ (स्टेट सेंट्रिक) आहे. याउलट, ‘राष्ट्रा’ची भारतीय संकल्पना ही राजकीय नसून सभ्यताविषयक आणि सांस्कृतिक आहे. भारत ही वैदिक ऋषींची पवित्र भूमी आहे. एक अशी संस्कृती जी आध्यात्मिकता, ज्ञान आणि सत्य यांना समर्पित आहे.

यामुळे आणखी एक प्रश्न निर्माण होतोः प्रत्येक भारतीयाला भारताचे मर्म, भारताचे मूळ स्वरूप खरोखरच समजले आहे का? केवळ मतदानाचा अधिकार असणे हाच भारताची ओळख, मूल्ये आणि राष्ट्रीय चेतना समजल्याचा पुरावा मानला जाऊ शकतो का? प्रत्येक भारतीय, भारताकडे ‘मातृभूमी’ आणि ‘पुण्यभूमी’ अशा दोन्ही दृष्टिकोनांतून पाहतो का आणि भारताच्या, भारतीयांच्या सुख-दुःखांशी, तसेच यशापयशाशी स्वतःला जोडून घेतो का? जर तसे नसेल, तर ती ‘भारतबोधा’ची कमतरता मानली जाऊ नये का? वास्तविक पाहता, भारताची समज असणे, भारताविषयी सखोल ज्ञान असणे हे अपरिहार्यपणे ‘भारतबोधा’कडे घेऊन जाते.

ढोबळमानाने विचार करता, यासंदर्भात दोन दृष्टिकोन आढळतात. एका दृष्टिकोनानुसार, भारताचे अस्तित्व १९४७ मध्ये निर्माण झाले आणि राष्ट्रनिर्मिती ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. दुसरा दृष्टिकोन असे मानतो की, जरी भारताला १९४७ मध्ये राजकीय स्वातंत्र्य मिळाले असले, तरी त्याचे संस्कृती विषयक अस्तित्व हजारो वर्षे जुने आहे. वारंवार झालेली आक्रमणे आणि विविध बाह्य प्रभावांना आत्मसात (परधर्मातील विविध बाबी) करूनही भारताने आपले मूळ सांस्कृतिक स्वरूप आणि आध्यात्मिक गाभा कधीच गमावला नाही. हा अखंड संस्कृतीविषयक प्रवाह म्हणजेच ‘भारतबोध’ होय. भारताचे व्यापक, सर्वसमावेशक स्वरूप समजून घेण्यासाठी सर्वप्रथम या देशाची सांस्कृतिक ओळख समजून घेण्याची आवश्यकता आहे, जिला बर्याचदा ‘सनातन संस्कृती’, ‘हिंदू विश्व-दृष्टिकोन किंवा ‘हिंदुत्व’ असे संबोधले जाते. जरी त्याच्या ऐतिहासिक उगम आणि उत्क्रांतीबद्दल दीर्घकाळ चर्चा आणि वाद होत असले, तरी ‘हिंदुत्व’ ही संकल्पना भारताच्या संस्कृतीविषयक चेतनेला व्यापकपणे व्यक्त करते आणि खर्या ‘भारतबोधा’चा पाया रचते.

या संकल्पनेविषयी अनेक गैरसमज आहेत. एक सामान्य दावा असा केला जातो की ‘हिंदू’ हा शब्द परकीय आक्रमकांनी रूढ केला. मात्र, ऐतिहासिक, ग्रंथविषयक आणि भाषिक पुरावे असे दर्शवतात की प्राचीन भारतीय स्त्रोतांमध्येही तत्सम शब्द अस्तित्वात होते आणि हा शब्द भारतातून पर्शियामध्ये गेला, उलट क्रमाने नाही. मुळात, हिंदुत्व ही ‘सनातन धर्मा’ची अभिव्यक्ती आहे. असा धर्म जो शाश्वत आहे आणि बदलत्या ऐतिहासिक परिस्थितीतही सुसंगत आहे, त्याची प्रासंगिकता नष्ट झालेली नाही. हे गैरसमज प्रामुख्याने इतिहासातून निर्माण झाले आहेत. एका सहस्त्रकाहून अधिक काळ भारतीय समाजाला वारंवार होणार्या परकीय आक्रमणांचा आणि सांस्कृतिक आव्हानांचा सामना करावा लागला. तरीही, भारताचा भूतकाळ हा केवळ परकीय वर्चस्वाचाच नव्हे, तर प्रतिकार, जिद्द, नवचैतन्य आणि पुनर्निर्माणाचाही इतिहास आहे. शतकानुशतके चाललेला इस्लामी विस्तारवाद आणि वसाहतवादी राजवट असूनही भारतीय संस्कृतीने आपली ओळख, सातत्य आणि मूल्ये प्राणपणाने जपली.

स्वातंत्र्यानंतर, भारताने त्याच्या संस्कृतीला, वारशाला अनुसरून मार्गक्रमण केले नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वदेशी आचार-विचारांमध्ये रुजलेल्या संस्थांचे जतन, पुनरुत्थान करणे अपेक्षित होते. पण तरीही तसे घडले नाही. पाश्चात्त्यांचा मोठा प्रभाव असलेले राज्यकर्ते वसाहतवादी मानसिकतेतून, त्यांनी आखलेल्या बौद्धिक चौकटीतून बाहेर पडलेच नाहीत. सत्तेच्या हस्तांतरणानंतरही आमच्या राज्यकर्त्यांमध्ये ‘स्व’ ची धारणा, ‘स्व’बोध राहिला नाही. शासन यंत्रणा तसेच शिक्षण व सांस्कृतिक तसेच बौद्धिक क्षेत्रात इंग्रजाळलेल्या लोकांचाच वरचष्मा राहिला. पाश्चात्यांनी मांडलेल्या संकल्पनांचे, गृहीतकांचे आमच्या राज्यकर्त्यांनी, इंग्रजाळलेल्या नोकरशहांनी निव्वळ अनुकरण केले. यामुळे अर्थातच वैचारिक व बौद्धिक क्षेत्रात पाश्चिमात्य विचारांचाच पगडा कायम राहिला. या सर्व क्षेत्रांत भारतीय विचारांना थारा दिला नाही. परिणामी एकामागोमाग पिढ्या त्यांच्या सांस्कृतिक मुळांपासून दूर गेल्या. एवढेच नव्हे तर आधुनिकीकरण म्हणजेच पाश्चात्यीकरण या कल्पनेला बळकटी मिळाली. या बदलामुळे विकास, सौंदर्यशास्त्र आणि उत्कृष्टतेच्या स्थानिक संकल्पनांकडे हळूहळू दुर्लक्ष करण्यात आले, त्यांची उपेक्षा करण्यात आली. ध्यान, योग आणि पारंपरिक योग पद्धतींना पाश्चिमात्य देशांत मान्यता मिळाल्यानंतरच या गोष्टींना भारतामध्ये व्यापक मान्यता मिळाली. त्याचप्रमाणे, आजही आयुर्वेदाकडे आधुनिक वैद्यकशास्त्राप्रमाणे समानतेच्या दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. तर खगोलशास्त्र आणि कालगणनेच्या परंपरांना वारंवार धार्मिक अनुष्ठानांच्या चौकटीतच बंदिस्त केले जाते.

भारताची वास्तुकला, शहरी नियोजन, वारसा संवर्धन-संरक्षण आणि सौंदर्यविषयक तत्त्वज्ञानाच्या परंपरा अत्यंत समृद्ध आहेत. तरीही पाश्चिमात्यांचे अविवेकी अनुकरण केल्याने अनेकदा सांस्कृतिक सरलीकरण आणि एकरूपीकरण (एकसंधता) निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे, भारताच्या पारंपरिक खाण्याच्या (खान-पान) सवयी, जीवनशैली, सामाजिक रीति-रिवाज आणि नैतिक प्रथा-पद्धती पर्यावरणीय चेतना आणि निसर्गाशी सुसंगतता दर्शवितात. पण भारताने स्वतःच्या दीर्घकालीन परंपरा असूनही अनेकदा टिकाऊपणाच्या मॉडेल्सकडे लक्ष दिले आहे. अशाप्रकारच्या घडामोडींमुळे भारत, भारतीयता आणि भारतीय ज्ञान प्रणालीबद्दल गैरसमज निर्माण झाले. ‘भारतबोधा’चा अभाव हा याच संस्कृतीविषयक स्मृतिभ्रंशाचा परिणाम आहे. जेव्हा एखादा समाजाला त्याच्या ‘स्व’चा (आंतरिक स्व), स्वत्वाचा (स्व-ओळख) आणि सांस्कृतिक मुळांचा विसर पडतो तेव्हा वैचारिक गोंधळ, संभ्रम, हीनता (न्यूनगंड) आणि आत्मसंशय उत्पन्न होतो. त्यामुळे या गैरसमजांवर मात करणे आणि संस्कृतीविषयक आत्मविश्वास पुन्हा प्राप्त करणे हे भारतबोध आणि भारतीय ज्ञान प्रणालीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### भारतबोधाचे सार

या दृष्टिकोनातून पाहता, ‘भारतबोध’ हा भारतीय ज्ञानपरंपरेचा (भारतीय नॉलेज सिस्टीम) सांस्कृतिक व सभ्यताविषयक पाया आहे, तर ती ज्ञानपरंपरा हे त्याचे बौद्धिक, आध्यात्मिक आणि व्यावहारिक प्रकटीकरण आहे. प्राचीन भारतातील ऋषीमुनींनी ज्ञानाकडे आत्मसाक्षात्कार, आत्मानुभूती, सामाजिक कल्याण आणि विश्वकल्याण यांचे साधन म्हणून पाहिले. ज्ञानाचा उद्देश निसर्गावर वर्चस्व गाजवणे किंवा संकुचित स्वार्थ साधणे हा नसून, व्यक्ती, समाज, प्रकृती (निसर्ग) आणि परम सत्य यांच्यातील परस्परसंबंधांची जाणीव करून घेणे हा होता. आधुनिक पाश्चात्त्य परंपरेत ज्ञानाला अनेकदा सत्तेशी जोडले गेले असले, तरी भारतीय परंपरेने ज्ञानाकडे अंतर्बाह्य शुद्धी, आत्म-परिवर्तन आणि उच्च सत्याच्या प्राप्तीचे साधन म्हणून पाहिले आहे.

भारतीय ज्ञानप्रणालीचे, परंपरेचे मूळ तत्त्व म्हणजे ‘एकात्मते’ची (सर्वत्र एकत्व, एकच तत्त्व (ब्रह्म) असण्याची दृष्टी; ही दृष्टी वेद, उपनिषदे, दर्शने, पुराणे आणि महान महाकाव्यांमध्ये व्यक्त झाली आहे. भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय विचार विश्वाकडे एक अखंड आणि परस्पर-संबंधित वास्तव म्हणून पाहते, ज्यामध्ये अध्यात्म, तत्त्वज्ञान, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, व्याकरण, साहित्य आणि कला या ज्ञानाच्या परस्पर-संबंधित शाखा म्हणून विकसित झाल्या आहेत. त्यानुसार, ज्ञान, वैज्ञानिक जिज्ञासा, सत्ता आणि अधिकार यांच्यासोबतच नम्रता, शहाणपण, संयम आणि कर्तव्यभावना यांचेही जतन केले जाते; कारण नैतिक जबाबदारीशिवाय ज्ञान अपूर्ण असते, हे यात मान्य केले गेले आहे.

भारतीय विचारसरणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ‘अंतिम सत्याचा शोध’ कधीही एका विशिष्ट धर्मग्रंथापुरता, व्यक्तीपुरता किंवा सिद्धांतापुरता मर्यादित ठेवला गेला नाही. शोध, जिज्ञासा, तर्क, संवाद, प्रत्यक्ष व्यावहारिक अनुभव आणि आध्यात्मिक साक्षात्कार या सर्वांना सत्यापर्यंत पोहोचण्याचे सुयोग्य मार्ग मानले गेले आहे. ‘आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः’ (चांगले, शुभ विचार सर्व दिशांनी आमच्याकडे येवोत) या वैदिक मंत्रात बौद्धिक मोकळेपणाची हीच भावना दिसून येते. यामुळेच भारताला सांस्कृतिक एकता टिकवून ठेवतानाच उल्लेखनीय ता्त्विवक विविधता जोपासता आली आणि मतभेद अथवा विविधतेकडे संघर्षाचे कारण म्हणून न पाहता संवादाची संधी म्हणून पाहता आले.

> **भारताची ओळख ही केवळ राजकीय नाही. तर या राष्ट्राचे आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक पैलू देखील तेवढेच महत्त्वाचे आहेत. भारतीय संस्कृतीतील चिरंतन मूल्ये आणि ज्ञान परंपरा एकत्रितपणे ‘भारतबोधा’च्या संकल्पनेला आकार देतात. ‘भारतबोध’ ही अशी चेतना आहे जी समाज, ज्ञान आणि धर्म यांच्या विशिष्ट आकलनाद्वारे राष्ट्राचा भूतकाळ, वर्तमान काळ आणि भविष्य काळ यांना जोडते.**

हिंदू विश्वदृष्टीनुसार, प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, मानवजात आणि संपूर्ण विश्व (ब्रह्मांड) यांच्याशी स्वाभाविकपणे (अविभाज्यपणे) जोडलेली असते. ‘आत्मा’ आणि ‘परमात्मा’ ही एकाच वैश्विक चेतनेची रूपे आहेत, असे ऋषीमुनींनी मानले. ‘सर्वं खल्विदं ब्रह्म‘ (हे सर्व काही ब्रह्मच आहे), ‘यत् पिण्डे तत् ब्रह्माण्डे’ (जे पिंडात - म्हणजेच सूक्ष्म शरीरात - आहे, तेच ब्रह्मांडात आहे) आणि ‘आत्मवत् सर्वभूतेषु’ (सर्व प्राणिमात्रांकडे आत्मदृष्टीने पहावे) या महावाक्यांमध्ये हा विचार प्रतिबिंबित होतो. ही वाक्ये अस्तित्वाचे ऐक्य आणि



मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट अधोरेखित करतात. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांची भारतीय संकल्पना याच एकात्मिक जीवनदृष्टीवर आधारलेली आहे. यात जीवनाच्या भौतिक आणि आध्यात्मिक पैलूंना समान महत्त्व दिले आहे. जिथे ‘अर्थ’ आणि ‘काम’ यांची प्राप्ती ‘धर्मा’च्या नैतिक चौकटीत राहून केली जाते, तर ‘मोक्ष’ हा आत्मसाक्षात्कार आणि अस्तित्वाशी पूर्ण तादात्म्य दर्शवतो. त्याचप्रमाणे, स्त्री आणि पुरुष यांना एकमेकांपेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठ न मानता परस्परांचे पूरक मानले जाते. अशा प्रकारे, भारतीय ज्ञानप्रणाली केवळ ज्ञानाचा संग्रह नसून ती जीवनाकडे पाहण्याचा एक समग्र दृष्टिकोन मांडते.

‘भारतबोध’ समजून घेण्यासाठी ‘धर्म’ या भारतीय संकल्पनेचे आकलन होणे तितकेच आवश्यक आहे. धर्म म्हणजे केवळ एखादा विशिष्ट पंथ किंवा उपासना पद्धती नव्हे, तर ते जीवन, समाज, निसर्ग आणि विश्वाचा क्रम (ब्रह्मांड व्यवस्था) यांना धारण करणारे व आधार देणारे तत्त्व आहे. ‘धारयति इति धर्मः’ (जे धारण करते, ते धर्म) अशी धर्माची व्याख्या करण्यात आली आहे. या उक्तीप्रमाणेच, यात कर्तव्य, नैतिक जबाबदारी आणि सदाचरण यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे, ‘नेति, नेति’ आणि ‘चरैवेति, चरैवेति’ ही वचने सत्याचा शोध आणि आत्मसाक्षात्कार याच्याशी संबंधित आहेत. अशाप्रकारे समान उद्दिष्टांनी जोडलेल्या विविध ता्त्विवक परंपरांचे जतन व संवर्धन भारताने केले आहे.

भारतीय दृष्टिकोनातून, मानवी अस्तित्व हे शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा संगम असलेले एक बहुआयामी स्वरूप आहे. मानवी अस्तित्वाच्या केवळ एकाच पैलूवर भर देणार्या दृष्टिकोनांच्या विपरीत, भारतीय तत्त्वज्ञान अशा एका सखोल चैतन्याला मानते जे व्यक्तीला समाज, राष्ट्र, संस्कृती आणि संपूर्ण मानवजातीशी जोडते. महर्षी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, गुरू गोविंद सिंग, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनात याच तत्त्वाचे प्रतिबिंब दिसून येते; ज्यांना कर्तव्यभावना, आध्यात्मिक निष्ठा आणि संस्कृतीविषयक चेतना यातून कार्य करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

भारतीय ज्ञानप्रणाली मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंधांकडे संघर्ष किंवा वर्चस्व या दृष्टीने न पाहता सहअस्तित्व, सुसंवाद, सामंजस्य आणि आत्मीयतेच्या भावनेतून पाहते. मानव हा निसर्गाचाच एक अविभाज्य घटक आहे; येथे पृथ्वीला ‘माता’, नद्यांना ‘जीवनदायिनी’, वनांना ‘संरक्षक’ आणि संपूर्ण सृष्टीला ‘ईश्वरी चैतन्याचे स्वरूप’ मानले जाते. ‘ईशोपनिषद’ शिकवण देते की, उपभोग घेताना अनिर्बंध हक्क गाजवण्याऐवजी संयम, जबाबदारी आणि आदरभाव यांचा अवलंब केला पाहिजे (त्यागपूर्वक भोग घ्या). हवामान बदल आणि पर्यावरणाचा र्हास होत असलेल्या आजच्या काळात या सांस्कृतिक दृष्टिकोनाचे महत्त्व नव्याने अधोरेखित झाले आहे.

आधुनिक संस्कृतीने विकासाचा अर्थ अनेकदा निसर्गावर, प्रकृतीवर विजय मिळवणे असा लावला असला, तरी भारतीय ज्ञानप्रणाली विकास आणि शाश्वतता, उपभोग आणि त्याग, अधिकार आणि कर्तव्ये, तसेच वैयक्तिक आकांक्षा आणि समाजाचे व्यापक हित यांच्यात सुसंवाद, संतुलन साधण्याचा प्रयत्न करते. ‘वसुधैव कुटुंबकम, ‘सर्वे भवन्तु सुखिनः आणि ‘एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति’ यासारख्या व्यापक संकल्पनांतून हा दृष्टिकोन व्यक्त होतो, जो भारतीय संस्कृतीचे वैश्विक आणि सर्वसमावेशक स्वरूप दर्शवतो.

‘भारतबोध’चा आणखी एक तितकाच महत्त्वाचा पैलू म्हणजे कर्तव्यभावना. समकालीन चर्चांमध्ये अनेकदा अधिकारांवर भर दिला जात असला, तरी भारतीय परंपरा असे मानते की कर्तव्यांच्या निष्ठापूर्वक पालनातूनच अधिकारांचे रक्षण होते. ‘व्यष्टी’ (व्यक्ती), ‘समष्टी’ (समाज) आणि ‘परमेष्टी’ (परम सत्य, ब्रह्म/ईश्वर) यांच्या माध्यमातून व्यक्त होणारे हे परस्पर-संबद्ध नाते हे अधोरेखित करते की, व्यक्ती, समाज आणि परम सत्य हे एकाच वैश्विक चेतनेशी जोडलेले आहेत.

थोडक्यात सांगायचे तर ‘भारतबोध’ म्हणजे केवळ भारताचा भूगोल, इतिहास किंवा राजकीय वाटचाल यांची समज नव्हे, तर त्याची सभ्यता, संस्कृती आणि ज्ञानपरंपरा यांची व्यापक, सर्वसमावेशक जाणीव होय. भारतबोध आणि भारतीय ज्ञानप्रणाली अविभाज्य आहेत; भारतीय ज्ञानप्रणालीची ओळख असल्याशिवाय भारताची समज अर्थात भारतविषयक जाणीव अपूर्णच राहते. प्रत्येक भारतीयाला वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, पुराणे, दर्शने, आगम, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, अर्थशास्त्र, योग, आयुर्वेद, खगोलशास्त्र, गणित, वास्तुकला, साहित्य आणि भारताच्या शैक्षणिक परंपरा यांची मूलभूत ओळख असायलाच हवी. तसेच त्यांना पाणिनी, पतंजली, कौटिल्य, आर्यभट्ट, वराहमिहीर, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य, चरक, सुश्रुत, नागार्जुन, भरत मुनी, कालिदास, आद्य शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य आणि इतर अनेक विद्वान व ऋषीमुनींच्या योगदानाची जाणीव व आदरही असायला हवा. भारतातील मंदिरे, तीर्थक्षेत्रे, गुरुकुल, प्राचीन विद्यापीठे, शिलालेख, स्मारके, लोकपरंपरा, सण-उत्सव, कौटुंबिक संस्था, ग्रामीण जीवन, पर्यावरणविषयक जाणीव आणि आदर्श हे या संस्कृतीच्या वारशाचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे, भारताला जाणून घेणे म्हणजे केवळ त्याच्या भूतकाळाचा अभ्यास करणे नव्हे, तर त्या सभ्यताविषयक चेतनेला समजून घेणे होय, जिने हजारो वर्षांपासून भारताची सांस्कृतिक एकता जपली आहे. हाच भारतबोधाचा गाभा आणि भारतीय ज्ञानप्रणालीचा खरा आत्मा आहे; याच आधारावर भारत आपल्या भूतकाळाचा अर्थ लावू शकतो, वर्तमानाला नवी दिशा देऊ शकतो आणि उद्देशपूर्ण व उज्ज्वल भविष्याची जडण-घडण करू शकतो.

**(ऑर्गनायझरवरून साभार)**

---

## दृष्टिक्षेप

प्रफुल्ल केतकर

# कारगिल विजय आणि दूरदर्शी सुधारणा

१९९९ मध्ये लडाखमधील कारगिल, द्रास आणि बटालिक क्षेत्रांत झालेली पाकिस्तानची घुसखोरी सर्वांसाठीच धक्कादायक होती. राजकीयदृष्ट्या, विरोधी पक्षांनी गुप्तचर यंत्रणेचे अपयश असल्याचा आरोप करीत या घटनेचा वापर वाजपेयी सरकारला लक्ष्य करण्यासाठी केला. ‘लाहोर बस डिप्लोमसी’नंतर झालेला हा विश्वासघात अस्वीकार्य होता; त्यातही लडाखसारख्या भागात, जिथे हिवाळ्यात दोन्ही बाजूंनी सहसा गस्त घातली जात नाही. तरीही, भारताने परिस्थिती पूर्णपणे पालटली आणि अत्यंत कठीण भूप्रदेशातील गमावलेला भूभाग परत मिळवून गौरवशाली विजय व लष्करी यश संपादन केले. मात्र, असे असले तरी, पाचशेहून अधिक शूरवीरांचे बलिदान आणि इतर अनेक मुद्यांमुळे ‘कारगिल पुनरावलोकन समिती’च्या (Kargil Review Committee) अहवालाच्या माध्यमातून आत्मपरीक्षणाची संधी निर्माण झाली. राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी सरकार, गुप्तचर संस्था, सशस्त्र दल आणि तज्ज्ञ यांना एकत्र आणले गेले. राष्ट्रीय सुरक्षेवर पहिल्यांदाच सर्वसमावेशक आणि गांभीर्याने चर्चा झाली, कारण ब्रिटीशकालीन ‘थिएटर सिस्टीम’मध्ये (लष्करी कार्यक्षेत्रांची रचना) आमूलाग्र बदल करण्याची गरज निर्माण झाली होती. कारगिल विजय दिवसाच्या २७ व्या वर्धापनदिनादरम्यान ‘इंटिग्रेटेड थिएटर कमांड’ला (एकात्मिक लष्करी कार्यक्षेत्र रचना) अपेक्षित मंजुरी मिळणे, ही या पुनरावलोकन प्रक्रियेतून आकारास आलेली एक महत्त्वाची सुधारणा होती.

कारगिल क्षेत्रातील घुसखोरीची माहिती ३ मे १९९९ रोजी मिळाली. बक्करवाल समुदायातील मेंढपाळ आणि गारकोन गावातील देशभक्त ग्रामस्थांनी- ज्यांची मदत ब्रिगेडची गुप्तचर टीम अधूनमधून सीमावर्ती भागातील माहिती गोळा करण्यासाठी घेत असे, त्यांनी लष्कराला याची सूचना दिली आणि ७ मे रोजी गस्ती पथकांनी याला दुजोरा दिला. १९ फेब्रुवारी १९९९ रोजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या ऐतिहासिक ‘लाहोर बस डिप्लोमसी’नंतर अवघ्या तीन महिन्यांतच, पाकिस्तानी लष्कराकडून शांततेच्या प्रयत्नांना बसलेला हा आणखी एक मोठा धक्का होता. पाकिस्तानचे हे धाडस (किंवा दुःसाहस) भारतासाठी ‘संकटातील संधी’ किंवा एकप्रकारचे वरदान ठरले. कारण यामुळे नवी दिल्लीला आपल्या लष्करी यंत्रणेचा आढावा घेण्याची आणि ती अधिक बळकट करण्याची संधी मिळाली.

> ‘देशात प्रथम स्थिर शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित केल्याशिवाय, जलद विकास आणि संसाधनांचे न्याय्यपूर्ण वितरण साध्य करता येणार नाही. म्हणूनच, देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य आहे आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रणालीगत सुधारणांची अंमलबजावणी कुठलाही विलंब न करता करणे गरजेचे आहे.’
>
> **– राष्ट्रीय सुरक्षेबाबतच्या मंत्रिगटाचा अहवाल (कारगिल समिती रिपोर्ट), २०००**



‘स्नो बूट्स’पासून ते संरक्षण उपकरणांपर्यंत सर्वच गोष्टी नोकरशाहीच्या अडथळ्यांमध्ये अडकल्या होत्या. तोफखाना आणि बंदुकांसाठी परदेशी पुरवठ्यावर असलेल्या अति-अवलंबित्वाची बाबही निदर्शनास आली. संरक्षण उत्पादनांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याच्या शक्यतेचाही विचार केला गेला. समितीने प्रसारमाध्यमांशी संबंध आणि संवाद धोरण (bomarnibation srtrategy) या गोष्टी राष्ट्रीय सुरक्षेचे महत्त्वाचे पैलू असल्याचे अधोरेखित केले. कारगिल हे भारताचे पहिले ‘टीव्हीवर दाखवले गेलेले’ युद्ध होते. तसेच, सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधा अद्ययावत करण्याची गरजही यातून अधोरेखित झाली. लष्करी कारवायांमध्ये परस्पर-समन्वय साधण्याशी संबंधित दोन अत्यंत महत्त्वाच्या शिफारशी होत्याः ‘संयुक्त संरक्षण प्रमुख अर्थात कंबाईंड डिफेन्स स्टाफ (सीडीएस) हे पद निर्माण करणे आणि वसाहतकालीन कमांड रचनेचे रूपांतर ‘इंटिग्रेटेड थिएटर कमांड’मध्ये करणे याचा या शिफारशींमध्ये समावेश होता. युद्धाचे भविष्यकालीन स्वरूप हे ‘नॉन-लिनियर’ (एकरेषीय नसलेले) असेल आणि त्यात रीअल-टाईम सर्विलान्स, इंटीग्रेटेड कमांड, कंट्रोल कम्युनिकेशन्स, कंप्युटर, गुप्तचर आणि माहिती यंत्रणा, लक्ष्य निश्चिती आणि अत्यंत घातक व अचूक मारा करणारी शस्त्रप्रणाली यांचा समावेश असेल, हे ओळखून केआरसीने केवळ भूतकाळातील अनुभवांवरच लक्ष केंद्रित केले नाही, तर देशाला भविष्यकालीन युद्धासाठी सज्ज करण्याचे एक महाकाय कार्य हाती घेतले.



मूळात, केआरसीने ही संपूर्ण पुनर्रचना पूर्ण करण्यासाठी दहा वर्षांचा कालावधी निश्चित करण्याची शिफारस केली होती. दुर्दैवाने, ‘धोरणात्मक लकवा’ आणि मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचारामुळे सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारला संरक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि आधुनिकीकरणाच्या आघाडीवर फारशी प्रगती करता आली नाही. नरेंद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आणि विशेषतः दिवंगत मनोहर पर्रीकर संरक्षण मंत्री झाल्यानंतरच, संरक्षण खरेदीमध्ये पारदर्शकता आणि तत्परता आणणे हा राष्ट्रीय अजेंडा बनला. यासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद देखील करण्यात आली. आता संरक्षण उत्पादनातील खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढला आहे. डीआरडीओ अधिक स्पर्धाक्षम बनले आहे आणि आता आपण संरक्षण तंत्रज्ञान व उपकरणांची मोठ्या प्रमाणावर निर्यात करीत आहोत. सीमावर्ती भागातील पायाभूत संरचनात देखील मोठी सुधारणा झाली आहे. कंबाईंड डिफेन्स स्टाफ (सीडीएस) हे पद निर्माण करण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा होता आणि जनरल बिपिन रावत यांनी १ जानेवारी २०२० पासून या प्रक्रियेला गती दिली. ‘इंटिग्रेटेड थिएटर कमांड’चा प्रस्ताव सध्या अंतिम स्वरूप घेत असला, तरी ‘ऑपरेशन सिंदूर’ दरम्यान आमच्या सशस्त्र दलांनी यापूर्वीच परस्पर समन्वय आणि संयुक्त कार्यक्षमतेचे (ऑपरेशनल ताळमेळ) उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे.

२७ व्या कारगिल विजय दिनानिमित्त, आमच्या सीमांचे रक्षण करणार्या सशस्त्र दलांचे शौर्य आणि निष्ठा यांचा गौरव करत असतानाच, सशस्त्र दले, गुप्तचर संस्था, संसद, सरकार, प्रसारमाध्यमे आणि संपूर्ण राष्ट्र यांनी यातून घेतलेल्या धड्यांचे सिंहावलोकन करण्याची ही एक योग्य वेळ आहे. आपल्याला हे समजून घेणे आवश्यक आहे की, केवळ सीमा सुरक्षेपुरती मर्यादित असलेल्या राज्य सुरक्षे’च्या (स्टेट सिक्युरिटी) पलीकडे ‘राष्ट्रीय सुरक्षा’ ही संकल्पना विस्तारलेली आहे. आज ‘फिफ्थ जनरेशन वॉरफेयर’ (पाचव्या पिढीतील युद्धतंत्र) मध्ये माहिती आणि विशिष्ट विचारप्रवाह (नॅरेटिव्ह) ही शत्रूची अत्यंत प्रभावी शस्त्रे बनली आहेत. त्यामुळे, आपली संस्कृती, संस्था आणि सामाजिक जडणघडण यांचे रक्षण करण्याची जबाबदारी केवळ सुरक्षा दलांवरच सोपवून चालणार नाही. युद्धाचे बदलणारे स्वरूप समजून घेणे, या प्रक्रियेतील प्रत्येक घटकाची भूमिका जाणून घेणे आणि या महान संस्कृतीचे जबाबदार घटक म्हणून अपेक्षित भूमिकांनुसार कृती करणे, यासाठी ही एक अत्यंत योग्य वेळ आहे. अशा प्रकारे, आपण सैनिकांच्या बलिदानाला यथोचित आदरांजली वाहू शकतो आणि कारगिलसारख्या कोणत्याही प्रकारच्या घुसखोरीची पुनरावृत्ती भविष्यात कधीही होणार नाही, हे सुनिश्चित करू शकतो.

**(ऑर्गनायझरवरून साभार)**

# सर्व शासकीय योजनाचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळालाच पाहिजे - पालकमंत्री मेघना साकोरे

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमीत्त आणि माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधुन ९५ जिंतूर विधानसभा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने दिनांक २४ जुलै २०२६ रोजी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, परभणी रोड जिंतूर येथे करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या महाराष्ट्र विकासाच्या अतुलनीय कार्याबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज व स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी मा. ना. सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, मा.सौ. लता विजयकुमार वाकळे अध्यक्ष जिल्हा परिषद, परभणी, मा.श्री. संजयसिंह चव्हाण जिल्हाधिकारी, परभणी (भा.प्र.से.), मा.श्री. प्रताप भैया देशमुख नगराध्यक्ष, नगरपरिषद, जिंतूर, मा.श्री. मिलींद सावंत नगराध्यक्ष, नगरपरिषद, सेलू, मा.सौ. आयोध्याताई किशोर खिस्ते, मा.सौ. विजयमाला ग्यानोजी डोंबे सभापती, पंचायत समिती, सेलू, यांच्यासह सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरपरिषद जिंतूर-सेलूचे नगरसेवक, विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या शिबिरामध्ये सर्व विभागांच्या विविध शासकीय योजना संदर्भातील माहिती देण्यासाठी व लाभार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी विविध स्टॉलचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन, नागरिकांसाठी माहिती तंत्रज्ञान मार्गदर्शन व रक्तदान शिबाराचे आयोजन करण्यात आले. विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व कागदपत्राचे वितरण, घरकुल योजनेअंतर्गत बांधकाम पूर्ण झालेल्या घराची चावी, विविध योजनांचे चेक वाटप करण्यात आले. राज्यमंत्री तथा पालकमंत्री सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विविध शासकीय योजनांच्या बाबतीत आढावा घेऊन पात्र लाभार्थी यांना विनासायास लाभ मिळाला पाहिजे. यासाठी सर्व अधिकारी यांनी आपल्या कर्तव्याप्रति तत्पर असले पाहिजे. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागामार्फत सुरू असणाऱ्या योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करता आली पाहिजे. असे प्रतिपादन केले. उपस्थित लाभार्थी यांच्या योजना बाबतीत प्रतिक्रिया जाणून घेतल्या. या समाधान शिबिरात संबोधित करताना शासन, प्रशासन गतिमान करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक यांनी देखील जागृत राहिले पाहिजे. विविध शासकीय योजनांची माहिती आपण घेतली पाहिजे. सर्वांनी शिक्षणाच्या बाबतीमध्ये आग्रही असले पाहिजे. स्वयंप्रेरणेने शिक्षण घेतले पाहिजे. स्त्री शक्तीचा सन्मान केला पाहिजे. कुटुंबातील स्त्रीची प्रगती झाली तर संपूर्ण कुटुंबाची प्रगती होते. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी केले. उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार शितल कच्छवे, डॉ शिवाजी मगर यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिंतूर व सेलू तहसील कार्यालयातील तसेच दोन्ही तालिकातील सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शितल कच्छवे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ शिवाजी मगर यांनी केले. सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी आणि सौ. भक्ती कुलकर्णी यांनी केले.



## संक्षिप्त वृत्त...

### महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या परभणी जिल्हाप्रमुखपदी पैलवान संतोष उर्फ अमोल सोनाजी मोरे यांची निवड



**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्ह्यातील युवा कुस्तीप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते पैलवान संतोष उर्फ अमोल सोनाजी मोरे यांची महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या परभणी जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे पैलवान संग्राम कांबळे यांनी नुकतीच ही घोषणा केली.

मोरे यांच्या निवडीचे जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्रासह विविध सामाजिक संघटना, पदाधिकारी, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांकडून स्वागत व अभिनंदन करण्यात येत आहे.

पैलवान संतोष उर्फ अमोल मोरे हे गेल्या १० ते १५ वर्षांपासून जगदंब कुस्ती संघटनेच्या माध्यमातून श्रीक्षेत्र त्रिधारा येथे दरवर्षी भव्य निकाली कुस्ती मैदानाचे यशस्वी आयोजन करत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे परभणी जिल्ह्यातील कुस्तीला चालना मिळाली असून अनेक होतकरू मल्लांना आपले कौशल्य दाखविण्याचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

कुस्ती क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. जगदंब प्रतिष्ठान या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी परभणीत जगदंब कुस्ती संकुल उभारण्याचा संकल्प साकारला असून, जिल्ह्यातील कुस्ती परंपरेला नवी दिशा देण्याचे काम सुरू केले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी जंगी निकाली कुस्त्यांचे आयोजन, विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम, रक्तदान शिबिरे तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येते. याशिवाय होतकरू पैलवानांना खुराकासाठी मानधन व आर्थिक मदत करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही ते सातत्याने करत आहेत. परभणी जिल्ह्यात अधिकाधिक गुणवंत पैलवान घडावेत, कुस्तीची परंपरा अधिक समृद्ध व्हावी आणि नवोदित खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने पैलवान मोरे सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे परभणी जिल्ह्यात कुस्तीच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास जिल्ह्यातील कुस्तीपटू, क्रीडाप्रेमी व विविध सामाजिक संघटनांनी व्यक्त केला असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### विश्व हिंदू परिषदेच्यावतीने गोपाळ दिंडीने वेधले परभणीकरांचे लक्ष

**परभणी,/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने बालगोपाळांमध्ये वारकरी परंपरेचे संस्कार रुजविण्यासाठी विश्व हिंदू परिषद, परभणीच्या वतीने गेल्या ४८ वर्षांपासून आयोजित करण्यात येणारी भव्य गोपाळ दिंडी यंदाही उत्साहात आयोजित करण्यात आली आहे. शनिवार २५ जुलै रोजी सकाळी ८ वाजता माळी वेस येथील हनुमान मंदिरातून दिंडीला प्रारंभ झाला असून शहरातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येने या दिंडीत सहभागी झाले होते.

आषाढी एकादशीला लाखो वारकरी पंढरपूरची वारी करतात. त्याच परंपरेचा संस्कार बालकांवर व्हावा, या उद्देशाने परभणीत 'प्रति पंढरपूर' उभारण्याचा उपक्रम विश्व हिंदू परिषद गेल्या चार दशकांहून अधिक काळ सातत्याने राबवत आहे. या दिंडीत संत परंपरा, वारकरी संस्कृती, भक्तीभाव आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडते. यंदाच्या दिंडीत संत मेळा, चलचित्र, पावली वारकरी, टाळ-मृदंग, अभंगगायन तसेच पारंपरिक वेशभूषा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.

दिंडीचा मार्ग माळी वेस येथील हनुमान मंदिर, नारायण चाळ, स्टेशन रोड, गुजरी बाजार, शिवाजी चौक, नाना पेठ, विद्यानगर मार्गे माऊली मंदिर असा राहिला असून तेथे दिंडीचा समारोप झाला. प्रारंभी यजमानांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात येणार आले. यावर्षीच्या दिंडीचे विशेष आकर्षण म्हणून डॉ. संजय टाकळकर यांच्याकडून पंढरपूरच्या धर्तीवर अश्वारोहण आणि रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरला होता. दिंडीत सहभागी होणाऱ्या बालगोपाळांसाठी शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, व्यापारी असोसिएशन, सराफा असोसिएशन, लायन्स क्लब तसेच विविध सामाजिक संस्थांच्या वतीने प्रसाद व फराळाचे वाटप करण्यात आले होते. दरवर्षी प्रमाणे ही दिंडी परभणीकरांसाठी एक नवी संजिवनीच घेवून येत असते. त्यामुळे या बाळ गोपाळांच्या दिंडीचा आनंद, उत्साह पाहून शहरवासिय मात्र यावेळी चांगलेच सुखावले हाते. पांडूरंगाच्या घोषणानी परिसर दणाणला होता.



### पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे पाचेगावकरांचा रस्ता रोकोचा इशारा

**जिंतूर,/प्रतिनिधी-**तालुक्यातील पाचेगाव येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. गावातील विहिरी, बोअरवेल व इतर जलस्रोत आटल्यामुळे नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले असून, महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना अनेक किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत असल्याने मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

याबाबत ग्रामस्थांनी तहसीलदार, जिंतूर यांना दि.२३ जुलै रोजी नायब तहसीलदार प्रशांत राखे यांच्या कडे निवेदन देऊन तातडीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. वारंवार सरपंच व ग्रामसेविका यांच्याकडे तक्रारी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सध्या गाव जलजीवन मिशनमध्ये समाविष्ट असतानाही पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास दि. २७ जुलै रोजी सकाळी १० वाजता जिंतूर-औंढा रोडवरील पाचेगाव येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा छत्रपती ससे,आनंद डोंगरे,कैलास गोडसे, गणेशराव ससे, कुंडलिक ससे, गोविंद ससे,कानिफनाथ तळेकर आदीं ग्रामस्थांनी निवेदनातून दिला आहे. सदर निवेदनावर गावातील अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून त्याची प्रत तहसील कार्यालय जिंतूर व जिंतूर पोलीस ठाण्यास देण्यात आली आहे. पाण्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## शांताबाई नखाते विद्यालय पाथरी येथे आषाढी एकादशी निमित्त ज्ञान दिंडीचे आयोजन

**पाथरी,/प्रतिनिधी-**शांताबाई नखाते विद्यालय पाथरी येथे आज दिनांक २५ जुलै शनिवार रोजी आषाढी एकादशी निमित्त ज्ञान दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव तथा परभणी जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सौ .भावनाताई अनिलरावजी नखाते यांची उपस्थिती होती तर प्रशासकीय अधिकारी रोहिदास टेंगसे मुख्याध्यापक नवनाथ यादव ,मुख्याध्यापक किशन डहाळे व प्राचार्य राजकुमार कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्थान भूषविले. सकाळी ठीक आठ वाजता प्रस्तुत विद्यालयातून ज्ञान दिंडी काढण्यात आली.या दिंडीमध्ये अनेक बाल वारकऱ्यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेत येऊन दिंडीची शोभा वाढवली. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी अभंग,भारुडे व गवळणी यांचे सादरीकरण केले . कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ.भावनाताई अनिलरावजी नखाते यांच्या हस्ते विठ्ठल रुक्माई च्या प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शास्त्री महाराज यांनी केले तर आभार बळीराम चव्हाण यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी,शिक्षक , प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### परभणीत रिमझिम पावसाचे आगमन


**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी शहरात आषाढी एकादशीनिमित्त रिमझिम अशा पावसाचे आगमन झाले असूनयावेळी साक्षात विठूरायाच्या दर्शनासाठी जणू वरुणराजा देखील आपली हजेरी लावली होती. यावेळी दुपारच्या सुमारास पडलेल्या या पावसामुळे उकाडा देखील मोठया प्रमाणात जाणवू लागला होता. तसेच या पावसामुळे काहीसा नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

### वयाच्या अवघ्या ३५ व्या वर्षी बहिरेपणाच्या समस्येने ग्रासलेल्या तरुणाची श्रवण शक्ती परभणीच्या आर.पी हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टरांच्या कौशल्यामुळे परत मिळाली.

**परभणी,/प्रतिनिधी-** वयाच्या अवघ्या ३५ व्या वर्षी बहिरेपणाच्या समस्येने ग्रासलेल्या तरुणाची श्रवण शक्ती परभणीच्या आर.पी हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टरांच्या कौशल्यामुळे परत मिळाली.

परभणी येथील हा तरुण बऱ्याच दिवसांपासून कानातून पू व पाणी येणे, सतत कान दुखणे आणि हळूहळू ऐकू येणे, आयकू कमी येणे व नंतर काहीही न ऐकू येणे या त्रासाने त्रस्त होता. दुर्बिणीतून () कानाची तपासणी केल्यानंतर प्राथमिक समस्या स्पष्ट झाल्या. श्रवण क्षमता तपासणीसाठी ऑडिओमेट्री विभागात तपासणी दरम्यान रुणाला फक्त १०% ऐकता येत असल्याचे निष्पन्न झाले.वयाच्या विशी-पस्तिशीतच आलेल्या या गंभीर आजारामुळे आणि उपचारांच्या वाढत्या खर्चाला कंटाळून रुग्ण परभणीसह विविध बाहेरील खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी फिरत होता; परंतु त्याला कुठेही पुरेसा दिलासा मिळाला नाही.अखेर, आर.पी हॉस्पिटलचे नामवंत कान, नाक, घसा () तज्ज्ञ डॉ. मो. फैज उर रहमान यांनी या रुणास तपासले आणि त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. डॉ. फैज उर रहमान यांनी अत्यंत कुशलतेने ही क्लिष्ट शस्त्रक्रिया दोन टप्प्यांत यशस्वीरीत्या पूर्ण केली.

## मुखी विठ्ठल, हृदयी विठ्ठल! आषाढी एकादशीला वडीच्या अंगणवाडीतील बालगोपालांची भक्तिमय दिंडी



**पाथरी ,/प्रतिनिधी-:** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त पाथरी तालुक्यातील वडी येथील अंगणवाडीतील चिमुकल्या बालगोपालांनी भक्ती आणि पर्यावरण यांचा अनोखा संगम घडवला. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या बालकांनी ''मुखी विठ्ठल, हृदयी विठ्ठल, जय हरी विठ्ठल!'' चा जयघोष करत गावातून भक्तिमय दिंडी काढली.

आषाढी एकादशीनिमित्त आयोजित या उपक्रमात लहानग्यांनी विठ्ठल-रखुमाईच्या वेशात सहभाग घेतला. टाळ-मृदुंगाच्या गजरात निघालेल्या दिंडीने संपूर्ण गावात वारकरी संस्कृतीची झलक दाखवली. या माध्यमातून बालकांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख करून देतानाच संस्कार आणि भक्तीचे धडे देण्यात आले.

''एक मूल एक झाड'' चा संकल्प दिंडीनंतर अंगणवाडी परिसरात वृक्षलागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. ''एक मूल एक झाड'' या संकल्पनेतून प्रत्येक बालगोपालाने स्वतःच्या हाताने रोप लावले. लहान वयातच मुलांमध्ये निसर्गप्रेम आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, हा यामागचा उद्देश होता.

या उपक्रमामुळे अंगणवाडी परिसरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. भक्ती, संस्कार आणि पर्यावरण संवर्धन एकत्र आणणाऱ्या या उपक्रमाचे गावकऱ्यांसह सर्व स्तरातून कौतुक होत आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका विजयमाला गिलबिले, मिरा पांचाळ, मिना थावरे, अर्चना दुधगावकर, मंजुळा आव्हाड, राजामती आव्हाड आदींनी विशेष परिश्रम घेतले.





सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# एकीकडे समायोजन, दुसरीकडे आठ महिन्यांपासून वेतनाची प्रतीक्षा

## जलजीवन-स्वच्छता मिशनचे हजारो कर्मचारी आंदोलनात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ जुलै -**

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या १ हजार १३६ कंत्राटी कर्मचाऱ्यांना गेल्या आठ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. थकीत वेतन तातडीने अदा करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले असून, नांदेड जिल्हा परिषदेतही कर्मचाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांना निवेदन दिले आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत दोन परस्परविरोधी चित्रे समोर आली आहेत. एकीकडे आरोग्य व शिक्षण विभागातील १० ते १५ वर्षांपासून कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची प्रक्रिया वेगाने सुरू असून त्यांना कायम सेवेचे संरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे. तर दुसरीकडे जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना आठ महिन्यांपासून वेतनच मिळालेले नाही, शिवाय त्यांच्या समायोजनाबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

विशेष म्हणजे, जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत अनेक कर्मचारी गेल्या २० ते २२ वर्षांपासून सातत्याने सेवा बजावत आहेत. उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) यांनी १० वर्षे पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत सकारात्मक आदेश दिलेले असतानाही या विभागातील कर्मचाऱ्यांना समायोजनापासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे. उलट, राज्य शासनाकडून या कर्मचाऱ्यांनी नेमके कोणते काम केले, त्यांची आवश्यकता आहे का, त्यांचे काम समाधानकारक आहे की नाही, यासंदर्भातील माहिती मागविण्यात आली आहे.

दोन दशकांहून अधिक काळ राज्यातील स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त अधिक गावांची निर्मिती, हर घर नल हे जल, घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कम मुक्त उपक्रम, ग्रामस्वच्छता, जनजागृती, वर्तन परिवर्तन, पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्थापन यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच आज स्वतःच्या अस्तित्वाबाबत प्रश्न निर्माण झाला आहे, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. दरमहा नियमितपणे शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवूनही वेतनासाठी महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. घरभाडे, मुलांचे शिक्षण, बँक कर्जाचे हप्ते, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असून अनेक कर्मचाऱ्यांना कर्ज काढून संसाराचा गाडा चालवावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, गेल्या आठ महिन्यांतील थकीत वेतनाबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आतापर्यंत ३० ते ३५ निवेदने व पत्रे संबंधित विभाग, वरिष्ठ अधिकारी आणि शासनाकडे सादर करण्यात आली आहेत. याशिवाय मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊनही वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली. मात्र, वारंवार पाठपुरावा, निवेदने आणि प्रत्यक्ष चर्चेनंतरही वेतनाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

कर्मचारी संघटनांनी राज्य शासनावर नाराजी व्यक्त करताना, शासन आमच्याकडून नियमित काम करून घेत असताना वेळेवर वेतन देण्याची जबाबदारीही शासनाचीच असल्याचे स्पष्ट केले. कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित दिले जात असताना कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मात्र निधीअभावी वेतन रोखले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. विशेष म्हणजे, जलजीवन मिशनच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा निधी राज्यस्तरावर उपलब्ध असल्याची माहिती आहे, तर स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक निधी पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागणीत मंजूर करण्यात आला आहे. असे असूनही संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन अद्याप वितरित झाले नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे.

पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संरक्षणासाठी लोकांमध्ये वर्तन परिवर्तन घडवून आणणाऱ्या या कर्मचाऱ्यांनाच आज आठ महिन्यांपासून वेतन नाही, समायोजनाबाबत अनिश्चितता आहे आणि त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे की नाही, याचाही शासनाकडून पुनर्विचार केला जात आहे. त्यामुळे दोन दशकांहून अधिक काळ सेवा दिल्यानंतर आता पुढे आपले काय होणार, असा मोठा प्रश्न या कर्मचाऱ्यांसमोर उभा राहिला आहे. कर्मचाऱ्यांनी शासनाकडे थकीत वेतन तातडीने अदा करणे, न्यायालयीन आदेशांनुसार समायोजनाची प्रक्रिया राबविणे आणि पुढील काळात नियमित वेतनासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याची मागणी केली आहे.

**३ ऑगस्टपासून मुंबईत व्यापक आंदोलनाचा इशारा**

महाराष्ट्र राज्य कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी सांगितले की, आठ महिन्यांपासून वेतन न मिळणे ही अत्यंत गंभीर बाब असून शेकडो कर्मचाऱ्यांचे संसार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. वेतनासाठी संघटनेने आतापर्यंत ३० ते ३५ निवेदने, पत्रे आणि मंत्रालय स्तरावर अनेकदा प्रत्यक्ष भेटी देऊन पाठपुरावा केला; मात्र शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. राज्य शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून सर्व प्रलंबित वेतन अदा करावे. तसेच उच्च न्यायालय व मॅटच्या आदेशांनुसार पात्र कर्मचाऱ्यांचे समायोजन तातडीने करावे. अन्यथा ३ ऑगस्टपासून मुंबई येथे राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

# शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा सिडकोत डॉ. आंबेडकरी युवकांचा जल्लोष

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २५ जुलै -**

सिडको येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरी विचारधारायचे व संविधानाचे रक्षक युवकांचा दोन दिवसीय संविधान वाचन करून नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीकडून जंतर मंतरवर सुरू असलेलं आंदोलनास समर्थन करण्यात आले होते. यामध्ये धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने आंदोलकांचा मोठ्याविजयामुळे सिडकोतील युवकांनी जल्लोष करून आनंद उत्सव साजरा केला.



सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार धारेच्या युवकांनी नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीकडून जंतर मंतरवर सुरू असलेलं आंदोलन आणि देशभरातून या आंदोलना मिळत असलेला पाठिंबा याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. या राजीनामेच्या समर्थनात सिडको येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारेचे युवकांनी फटाक्यांची आताशिवाजी करून जल्लोष करण्यात आला. यावेळी युवानेते सम्राट आढाव, प्रसेनजीत वाघमारे, विलास गजभारे,आकाश गजभारे,प्रदीप हानवते, चंपतराव कांबळे, देविदास पाटील कदम, ज्योती कदम,संदीप कदम,उषा मोरे, अनिल मोरे, शेख लतीफ, शेख नुरोद्दीन, दीपक भरकड, रमेश भुरे, संभाजी बसवंते, भास्कर मोरे, रामचंद्र जमदाडे ,महादेव महाराज इत्यादीची उपस्थिती होती यावेळी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे आर पी यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांचा चौक बंदोबस्त होता.

# मुदखेडमध्ये डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी मारोती डुबुकवाड यांचे थेट सरणावर आमरण उपोषण!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २५ जुलै -**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणीसाठी दि.१५ ऑगस्ट २०२६ रोजी पासुन आमरण उपोषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या नियोजीत ठिकाणी उपोषणकर्ते मारुती शिवाजी डुबुकवाड हे स्वतासाठीच स्वता सरण रचुन अनोखे आमरण उपोषण करणार आसुन आमरण उपोषण करीत आसताना त्यांच्या जीवीतास काही झाल्यास त्याच ठिकाणी त्यांचे सरण रचुन अग्नी देण्यात यावे असे निवेदन दि.२४ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारीसह आयुक्त नगरपालिका प्रशासन विभाग नांदेड. मुख्याधिकारी न.प.मुदखेड पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन मुदखेड. यांना देण्यात आले.



यापुर्वी माझे पाच वेळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी आमरण उपोषण झाले परंतू आजपर्यंत मा.जिल्हाधिकारी मा. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी मला फक्त पुतळ्यासाठी आश्वासन देण्यात आले आहे. डुबुकवाड यांनी वारंवार अर्ज करून सुध्दा न्याय मिळाला नससल्याने दि.१५.०६.२०२६ रोजी जिल्हाधिकारी यांना भेटुन अर्ज दिला होता त्यावेळेस त्यांनी मला मुख्याधिकारी यांना बोलाऊन सांगतो म्हणुन एक महिना झाला तरी कसलीच दखल घेतली नाही. पुतळा समितीचा ठराव दि.१०.०२.२०२६ ला दिलेला आहे. पाच महिने झालेले आहे. दि.२.०५.२०१३ शासन जिआरनुसार क्र. २० मुद्द्या अनुसार सहा महिन्याच्या आत पुर्ण प्रक्रिया तयार करून परवानगी देण्यात यावे असे नमूद केलेले आहे. त्या जिआरनुसार देण्यात यावे. त्या जागी मुख्याधिकारी यांनी गट क्रमांक ५६७ मधील दोन्ही रस्त्यापासुन ३.०० मीटर रुंदीच्या आत पुतळा बसविणे साठी कळविले आहे. ते पत्र यासोबत जोडत आहे. असे निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे.

## अमानचा वाढदिवस गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य भेट देत साजरा

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे कार्यालयीन सहाय्यक तथा महाराष्ट्र ग्रामीण न्यूज पत्रकार महमदरफी फक्रूशा मदार यांचे सुपूत्र चि.अमान मदार चा आठवा वाढदिवस शुक्रवार दि.२४ जुलै रोजी सायंकाळी परिसरातील गरजू लहान मुलांना वही,पेन,चॉकलेट शैक्षणिक साहित्य वाटप करीत साजरा करण्यात आला.सकाळी जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळेतही सर्वच मुलांना चॉकलेट भेट देत शिक्षक मंडळींसह वाढदिवस अभीष्टचिंतन करण्यात आले.सदरील कार्यक्रमास महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक फक्रूशा पिरसाब मदार, सौ. बिस्मिल्लाबी मदार,कवी, गीतकार,पत्रकार जाफर आदमपूरकर,सना आदमपूरकर, संजय नागेश्वर, महमदरफी मदार,रेशमा मदार, सद्दाम शेख,अयान आदमपूरकर, अदिबा आदमपूरकर,आमेरा मदार,सोहम अनपलवार, अनन्या नागेश्वर,शुभम नागेश्वर, रियान शेख,विराज नाईक, अनुश्री नागेश्वर,श्रेयस नागेश्वर, सुफियान शेख,गोविंद नाईक, मन्मथ इंगळे,महेबुब शेख, महेक शेख,विकास इंगळे, माहीन शेख,मुख्तार शेख, दस्तगीर शेख आदि बच्चे मंडळी, कुटुंबीय सदस्य तथा लहान मुलांची भरगच्च उपस्थिती होती.

## मुदखेड येथील माधवी देशमुख यांनी प्राप्त केली वकिलीची सनद

**मुदखेड**-मुदखेड येथील महात्मा गांधी विद्यालयाची माजी विद्यार्थिनी माधवी श्रीकांत देशमुख हिने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करत यशवंत महाविद्यालयातून' बी.कॉम ची पदवी पूर्ण केल्यानंतर, माधवीने नाशिक येथील नामांकित संदीप युनिव्हर्सिटीमधून एल.एल.बी.ची पदवी यशस्वीपणे प्राप्त केली आहे. 'डबल पदवी मिळवून तिने आपल्या अफाट कर्तृत्वाचा ठसा उमटवत एल.एल.बी. पूर्ण केल्यानंतर माधवीने बार कौन्सिल ऑफ इंडियातर्फे घेतली जाणारी अत्यंत महत्त्वाची 'ऑल इंडिया बार एक्झामिनेशन ही परीक्षा उत्तीर्ण केली. या यशाच्या जोरावर तिला 'बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा' यांच्याकडून अधिकृतपणे वकिलीची सनद प्राप्त झाली असून, आता त्या न्यायालयीन क्षेत्रात वकिली व्यवसायासाठी सज्ज झाल्या आहेत.माझ्या या यशाचे संपूर्ण श्रेय मी माझे आई-वडील आणि समस्त देशमुख परिवाराला देते. त्यांच्या पाठींबा आणि प्रेरणेमुळेच मी हे यश मिळवू शकले असं मत ड. माधवी श्रीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.



## शाळा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी गणेश तमलवाड

**हदगाव**-येथील शासन अनुदानित शाळा कर्मचारी कल्याण सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन (अध्यक्ष) पदी गणित विषयाचे शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते गणेश तमलवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे. या पतसंस्थेत सुमारे ४५० सभासद असून त्यांच्या निवडीमुळे हदगाव व परिसरातील शिक्षक आणि कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सन १९८८ मध्ये स्थापन झालेल्या या पतसंस्थेच्या इतिहासात आजपर्यंत चेअरमनपदी मुख्याध्यापक किंवा उपमुख्याध्यापक पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तींचीच निवड होत आली होती. यापूर्वी आदर्श विद्यालय, मानाठा येथील मुख्याध्यापक बी. डी. नाईक यांनी चेअरमन म्हणून जबाबदारी सांभाळली होती. मात्र, प्रथमच मुख्याध्यापक किंवा उपमुख्याध्यापक नसलेल्या शिक्षकाची चेअरमनपदी निवड झाल्याने या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. बिनविरोध निवडीनंतर शिक्षक, कर्मचारी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी गणेश तमलवाड यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.



# आषाढी एकादशी निमित्त किनवट तालुक्यात भक्तिमय वातावरण

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २५ जुलै -**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त किनवट शहरासह संपूर्ण तालुक्यात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांसह विविध देवस्थानांमध्ये दिवसभर धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, हरिनाम सप्ताह, महापूजा, आरती आणि फराळाचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपवास करून विठ्ठलाच्या दर्शनासाठी मंदिरांमध्ये गर्दी केली.

किनवट शहरातील सरस्वती विद्या मंदिर तथा शिशु विहार येथील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी, टाळकरी आणि फुगडीच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत पंढरपूरच्या वारीचे जिवंत चित्र साकारले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल असा हरिनामाचा गजर करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणाचे पालक व नागरिकांनी कौतुक केले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने अनेक भाविकांनी दिवसभर उपवास करून विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाचा लाभ घेतला. विविध मंदिर संस्थान, विश्वस्त मंडळे तसेच दानशूर व्यक्तींच्या वतीने भाविकांसाठी फराळ, पिण्याच्या पाण्याची व इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली. ग्रामीण भागातही आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कमठाळा, बोधडी, मांडवी, इस्लापूर, गोकुंदा, सारखणी तसेच इतर गावांतील विठ्ठल मंदिरांसह विविध देवस्थानांमध्ये भजन, कीर्तन, हरिपाठ, पालखी सोहळे आणि सामूहिक आरतीचे आयोजन करण्यात आले. दिवसभर वारकरी संप्रदायाच्या अभंगांनी आणि हरिनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला. दरम्यान, किनवट शहरातील विठ्ठल भक्त परिवार यांच्या वतीने गजर हरिनामाचा या विशेष भजन संध्येचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार आहेत. आषाढी एकादशीच्या निमित्ताने किनवट-माहूर मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम तसेच किनवट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी समाजमाध्यमांद्वारे समस्त वारकरी, विठ्ठल भक्त आणि नागरिकांना शुभेच्छा देत समाजात शांतता, सद्भावना आणि भक्तीभाव वृद्धिंगत होवो, अशी प्रार्थना व्यक्त केली.

# शेतकरी विकास पॅनलच्या जिल्हास्तरीय तिन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा : कैलास देशमुख गोरठेकर

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २५ जुलै -**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलच्या एससी, एसटी, ओबीसी व व्हीजेएनटी प्रवर्गातील तिन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करून खासदार अशोकराव चव्हाण व सर्वपक्षीय नेत्यांचे हात बळकट करावेत, असे आवाहन शेतकरी विकास पॅनलचे बिनविरोध संचालक कैलास देशमुख गोरठेकर यांनी केले आहे



नांदेड येथील इस्का लाईट हॉटेलमध्ये 'क' व 'ब' मतदारसंघाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी खासदार अशोकराव चव्हाण होते. यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार राजेश पवार, आमदार अमर राजूरकर, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, डी. पी. सावंत, उमेदवार ज्ञानेश्वर दहिफळे, रामचंद्र मुसळे, अनिल पाटील बोरगावकर तसेच 'ब' मतदारसंघातून बिनविरोध निवडून आलेले उमेदवार शिवराम लुटे आणि किशोर स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना कैलास देशमुख गोरठेकर म्हणाले की, 'क' मतदारसंघातून आपण मला बिनविरोध निवडून दिल्याबद्दल मी सर्व मतदारांचा ऋणी आहे. त्याचप्रमाणे शेतकरी विकास पॅनलच्या जिल्हास्तरीय तिन्ही उमेदवारांना 'कप-बशी' या निवडणूक चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे, ही माझी सर्व मतदारांना नम्र विनंती आहे.

पुढे ते म्हणाले की, खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सक्षमपणे चालविण्यासाठी आम्ही सर्व संचालक एकत्रितपणे प्रयत्न करू. शेतकऱ्यांच्या हितासाठी बँकेला अधिक बळकटी देण्याचे काम करू. तसेच बँकेची विश्वासार्हता कायम राखत खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाला कोणताही तडा लागू देणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज विरोधात बाऱ्हाळी येथे काँग्रेसचे आंदोलन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २५ जुलै -**

दिल्ली येथे शांततेत सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलकावर अमानुष लाठी चार्ज विरोधात व दिल्ली येथील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अटकेच्या निषेधार्थ नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे यांच्या नेतृत्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात युवा काँग्रेस संघटनेचे युवा प्रदेशाध्यक्ष शिवशंकर पाटील कलंबरकर तसेच विविध संघटनांनी जाहीर



यावेळी काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, शिवशंकर पाटील कलंबरकर, सूर्यकांत अलडवाड, अंतेश्वर कोल्हेवाड, संजय सोनकांबळे, बनकर साहेब, राजू तोटकर,प्रकाश भंगे,प्रा.निळू पवार युवा काँग्रेस कार्यकर्ते संदीप पाटील निवळीकर, चंद्रशेखर नळगिरे, राहुल उमाटे,सुभाष कांबळे, पांडुरंग भिकनर, प्रकाश वाघमारे, प्रवीण मंगरूळे, महबूब शेख, खाजा कुरेशी, इस्माईल शेख यांच्या सह अनेक कायकर्ते उपाथित होते .

## राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कारासाठी शिवाजी गोडबोले यांची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ जुलै -**

प्रजा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था तथा भास्कर व्यायामशाळा व क्रीडा मंडळ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा-२०२६ अंतर्गत नांदेड येथील शिवाजी गोडबोले यांची प्रतिष्ठेच्या समाज भूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता नांदेड येथील डी. आर.एम. ऑफिस कॉम्प्लेक्स, येथे करण्यात आले आहे. या भव्य पुरस्कार सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती, शासकीय अधिकारी तसेच अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

# कारगील विजय दिवसानिमित्त नांदेडचे कॅप्टन प्रकाश नारायण कस्तुरे यांचा मुंबईत गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ जुलै -**

सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर शाहु सभागृह दादर मुंबई येथे आज प्रत्यक्ष कारगिल युध्दात सहभागी झालेल्या नांदेडच्या कॅप्टन प्रकाश नारायण कस्तुरे यांचा गौरव करण्यात आला.

मुळचे औसा येथील रहिवाशी असलेल्या प्रकाश नारायणराव कस्तुरे यांचे शालेय शिक्षण बिलोली येथे झाले. बालपणापासून देशभक्तीची भावना, शाळेमध्ये सैनिक दिवसासाठी घेतलेला पुढाकार यामुळे बालपणापासूनच सैन्यात जावे अशी त्यांची इच्छा. आर्मीमध्ये जाण्यासाठी शालेय शिक्षणानंतर त्यांनी आयटीआय केले आणि मोटार मेकॅनिकचा डिप्लोमा केला. त्यानंतर १९७५ मध्ये सैन्य दलात टेक्निशयन म्हणून संधी मिळाली. चांगल्या कामाच्या जोरावर त्यांना सैन्य दलात प्रवेश मिळाला. पंजाब, राजस्थान, अरुणचल प्रदेश, काश्मिर, आंध्रप्रदेश अशा विविध राज्यात त्यांना जावे लागले.



त्यानंतर प्रत्यक्ष कारगिल युध्दा त्यांनी सहभाग नोंदविला. त्यावेळचे अनुभव कथन करताना ते म्हणाले की, कारगिल पहाडीवरुन पाकिस्तानी सेनेने भारतावर हल्ला केला त्यात सगळ्यात भयानक गोष्ट म्हणजे पाकिस्तानी सैन्य हे उंचावर होते. त्यात भारतीय सैनिकांनी पायथ्यावरुन पाक सैनिकांना भंडावून सोडले आणि कारगिल टेकड्यावरुन पाक सैनिकांना भारतीय सैनिकांनी अखेर पळवून लावले. याचा साक्षीदार होण्याची मला संधी मिळाली. भयावह परिस्थितीत काम करताना त्यावेळी केलेला संघर्ष हा महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. ३० वर्ष सैन्य सेवेत व्यथित केल्यानंतर आपला मुलगा सुभेदार श्याम प्रकाश कस्तुरे जो सध्या लेह लद्दाख येथे कठीण परिस्थितीत भारतीय सिमेवर कार्यरत आहे. शासनस्तरावरुन वेगवेगळी अकरा पदके देवून त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. जीवन गौरव पुरस्कारानेही त्यांचा सन्मान झाला आहे. देशाचा सर्वोत्कृष्ट विशेष सेवा राष्ट्रपती पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. पत्नी ज्योतीताई कस्तुरे यांची मिळालेली साथ व मुलांनी दिलेले पाठबळ या हिमतीवर त्यांनी भारतीय सैन्य दलात केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. ए मेरे वतन के लोगो जरा आंखो भर लो पाणी हे गीत ऐकल्यानंतर त्यांच्या डोळ्यात अश्रू येतात आणि कारगिलच्या आठवणी जाग्या होतात. आज मुंबई येथे सैनिक फेडरेशनच्या वर्धापन दिनानिमित्त व कारगिल दिनानिमित्त आज छत्रपती शिवाजी महाराष्ट्र नाट्यमंदिर शाहु सभागृह दादर येथे त्यांचा सैनिक रत्न पुरस्कार म्हणून गौरव करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.